Prabhakar Patil Education Society's Arts, Commerce & Science College
Veshvi Alibag Raigad

प्रति,

मा.प्राचार्य,

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे,

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड

विषय - मराठी विभागाच्या कार्यक्रमास परवानगी मिळणेबाबत..

महोदय,

शैक्षणिक वर्ष 2022-23 यामध्ये दिनांक 30/07/2022 रोजी मराठी विभागाला महाकवी कालिदास दिन निमित्त वाङ्मय मंडळ उद्घाटन व काव्यवाचन या कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे. तरी याची आपण रितसर परवानगी द्यावी, ही नम्र विनंती.

धन्यवाद

आपले विश्वासू
(मराठी विभाग)
प्रा. नम्रता पाटील

I/C PRINCIPAL
Prabhakar Patil Education Society's
Arts, Commerce & Science College
Veshvi - Alibag

2022-23

# कार्यक्रम

महाकवी कालिदास दिनानिमित्त (काव्य वाचन) व वाङ्मय मंडळ उद्घाटन या कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी

| रोल नं | नाव | सही |
|---|---|---|
| 1016 | प्रज्ञेश विकास म्हात्रे | VM |
| 1008 | [illegible] दळवे | [illegible] |
| 1161 | फारुक नदीम सैय्यद | Farook |
| 1085 | आकांक्षा [illegible] थळे | A. Thale |
| 1096 | प्रज्वल संतोष मोहिरे | P.S. Mohire |
| 1026 | [illegible] पाटील | [illegible] |
| 1210 | पवन नारायण भावडे | [illegible] |
| 1211 | नमन नितिन [illegible] | [illegible] |
| 1219 | [illegible] संतोष [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | M.S. [illegible] |

| | |
|---|---|
| 1020 | Heer Jain |
| 1033 | Dhanshri gaikwad |
| [illegible] | Shruti Sanjay P[illegible] |
| 1166 | Harshada R. Hogad[illegible] |
| 2106 | Shravan Shetkar[illegible] |
| 2032 | Kaushal [illegible] |
| 2014 | Raj Ganesh [illegible] |
| 2062 | [illegible] Manohar |

Prabhakar Patil Education Society's Arts, Commerce & Science College Veshvi Alibag Raigad

| | | |
|---|---|---|
| 1020 | Heer Jain | H.D.J |
| 1099 | Dhanshri gaikwad | Dhanshri |
| 1197 | Shruti Sanjay Patil | [illegible] |
| 1166 | Harshada R. Hegade. | Harshada |
| 2106 | Shravan Sheshnath patil. | S.S.patil. |
| 2082 | KRUSHNA HIRAMAN HIRAVE | [illegible] |
| 2014 | Raj Ganesh wadkar | R.G.wadkar |
| 3062 | Karan Manohar Roy | [illegible] |

Arts, Commerce & Science College ... Raigad

# Department Activity Report

Prabhanand ... Education Society's Arts, Commerce & Science College, Vesavi, Alibag, Raigad

Department Name : मराठी

Name of Committee Head : प्रा. नम्रता पाटील

Members : रुपाली पाटील

Name of Activity / program : महाकवी कालिदास दिन (काव्यवाचन) वाङ्मय मंडळ उद्घाटन

Date : 30/07/2022 Time :

Venue : महाविद्यालय

No of Students : 25 Target Class : S.Y.B.A

Aim : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे

Objectives : विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे

Speaker : डॉ. ओमकार पोटे (प्राचार्य)

Outcomes : - विद्यार्थ्यांना कालिदास दिनाचे महत्व कळले

Limitation : - फक्त भाषा विभागाचे विद्यार्थी उपस्थित

Future Scope : - विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत

Report : दि. 30 जुलै 2022 रोजी मराठी भाषा विभाग व वाङ्मय मंडळ अंतर्गत महाकवी कालिदास दिनाचे औचित्य साधून काव्यवाचन स्पर्धा व वाङ्मय मंडळ उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, मराठी विभाग व कला विभागप्रमुख प्रा. नम्रता पाटील, प्रा. रुपाली पाटील विभागातील विद्यार्थी उपस्थित राहिले.

Signature of the Head

सिरियल 2022-23

# वाङ्मय मंडळ उद्घाटन

PAGE No.
DATE / /

| नाव | रोल नंबर | सही |
| --- | --- | --- |
| 1) विनया विनोद वर्तक | 75 | V. V. Vartak |
| 2) तुषार लक्ष्मण पाटील | 82 | Patil |
| 3) रोहीत किरण पाटील | 86 | R. Patil |
| 4) करण किरण पाटील | 85 | K.K.Patil |
| 5) रितीक जयेंद्र बावगडे | | Ritik |
| 6) मृतीक हेमंत पिंगळे | | Rhpingale |
| 7) कृतार्थ महेश पाटील | | K.Patil |
| 8) चेतन सुभाष पाटील | 70 | [illegible] |
| 9) अंकीता विजय पडवी | 55 | (A) Padvi |
| 10) समृद्धी संजय धुमाळ | 46 | S. S. Dhumal |
| 11) सुयोग संतोष इंदुलकर | 3041 | Indulkar |
| 12) दिपा कमलेश जैस्वाल | 3044 | D.K.Jaiswal |
| 13) श्रेयश जितेंद्र भोईर | 3008 | S.J.Bhoir |
| 14) शुभम संदीप म्हात्रे | 3081 | S.S.Mhatre. |
| 15) पूजा यशवंत ठाकूर | | P.Y.Thakur |
| 16) साक्षी जगदीश पाटील | | [illegible] |
| 17) साक्षी दिनेश शेळकर | | Shelkar |
| 18 मयुरेश कृष्णा पाटील | 3087 | M.K.Patil |

PAGE No.
DATE / /

तृतिय वर्ष कला (इंग्लिश) दि० ३०|६|२०२२

| | | |
|---|---|---|
| 1) | आविष्कार संजय पाटील | ABPatil |
| 2) | मयुर प्रशांत पाटील | M.P.Patil |
| 3) | विराज भालचंद्र राऊत | [illegible] |
| 4) | पुजा प्रविण म्हात्रे | P.Mhatre |
| 5) | सुरभी संतोष सावरे | Savare |
| 6) | साक्षी अनिल मोकल | S.A.Mokal |
| 7) | समृद्धी सुरेश नाईक | Samruddhinaik |

[illegible] 30/6/22



Prabhakar Patil Education Society's Arts, Commerce & Science College Veshvi Alibag Raigad

प्रति,

मा.प्राचार्य,

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे,

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड

**विषय - मराठी विभागाच्या कार्यक्रमास परवानगी मिळणेबाबत..**

महोदय,

शैक्षणिक वर्ष 2022-23 यामध्ये दिनांक 02/03/2023 रोजी मराठी विभागाला मराठी राजभाषा गौरव दिन (शिलालेख केणी विशेषांक अनावरण) या कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे. तरी याची आपण रितसर परवानगी द्यावी, ही नम्र विनंती.

धन्यवाद

आपले विश्वासू

(मराठी विभाग)

प्रा. नम्रता पाटील

I/C PRINCIPAL
Prabhakar Patil Education Society's
Arts, Commerce & Science College
Veshvi - Alibag

Prabhakar Patil Education Society's Arts, Commerce & Science College Veshvi Alibag Raigad

# Department Activity Report

Department Name : मराठी

Name of Committee Head : प्रा. नम्रता पाटील

Members : प्रा. रूपाली पाटील

Name of Activity / program : मराठी राजभाषा गौरव दिन (शिलालेख लेणी विशेषांक अनावरण)

Date : 02/03/2023 Time :

Venue : टी. वाय. बीकॉम क्लास I st Flore

No of Students : 35 Target Class : F.Y.B.A

Am : –

Objectives : मराठी भाषेविषयी जागृकता निर्माण करणे

Speaker : डॉ. अनिल नांगर

Outcomes : विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला

Limitation : –

Future Scope : –

Report : 27 फेब्रुवारी मराठी भाषादिनाचे औचित्य साधून दि. 02 मार्च 2023 रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी पेझारी महिला महाविद्यालयाचे डॉ. अनिल नांगर उपस्थित राहिले. सदर प्रसंगी मराठी विभागाच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य संस्थेचे संचालक, मराठी विभागप्रमुख व इतर प्राध्यापक उपस्थित राहिले.

Signature of the Head

Prabhakar Patil Education Society's

Arts, Commerce & Science College, Veshvi

Tal. Alibag, Dist. Raigad

## मराठी विभाग

उपक्रमाचे नाव : मराठी भाषा गौरव दिन

दिनांक 02/03/2023

| क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | रोल नं | सही |
|---|---|---|---|---|
| 1) | वेदांत विजय मोरे | F.Y.B.A | 1092 | [signature] |
| 2) | अनिल भिकू शेंगडे | F.Y.B.A. | 1044 | [signature] |
| 3) | मेघा संतोष गाडवे | F.Y.B.A | 1019 | M.S.Gadve |
| 4) | आकाश संदिप पवळे | F.Y.B.A | 1024 | आ. सं. पवळे |
| 5) | यशोश विकास म्हात्रे | F.Y.B.A | 1096 | [signature] |
| 6) | फाईक न. सैय्यद. | F.Y.B.A. | 1169 | [signature] |
| 7) | हर्षदिप दिपक म्हात्रे | F.Y.B.A | 1004 | J.D. mhatre |
| 8) | सिद्धेश्वर संदिप झावरे | F.Y.B.A | 1068 | [signature] |
| 9) | मनिष प्रदिप पाटील | F.Y.B.A | 1188 | M.P. Patil |
| 10) | निर्मला हेमंत पाटील | F.Y.BCom | 4077 | [signature] |
| 11) | किमया निलेश गोंधळी | F.Y.B.Com | 4100 | Gondhali |
| 12) | महिमा [illegible] कोलेटकर | F.Y.B.com | 4074 | MKoletkar |
| 13) | सानिया राजीव खरसंबळे | F.Y.B.com | 4033 | S.R. Kharsambe |
| 14) | स्मृती दयानंद पाटील. | F.Y.B.com | 4037 | S.D. पाटील. |
| 15) | प्रियंका विजय नाईक | F.Y Bcom | 4055 | [signature] |
| 16) | सिद्धी कैलास मोरे | F.Y Bcom | 4054 | S.K. more |
| 17) | दिक्षा उदय जगताप | F.Y Bcom | 4030 | Diksha |
| 18) | स्मृती महेश सालावकर | F.Y Bcom | 4076 | S.M. Salavkar |
| 19) | जान्हवी श्रीकांत गावंड | F.Y. Bcom | 4021 | J.S.Gavand |
| 20) | धनश्री श्रीकांत गायकवाड | F.Y.B.A | 1099 | D.S.gaikwad |
| 21) | जान्हवी कमलाकर पवार | F.Y.B.A | 1158 | [signature] |
| 22) | कृतिका संदेश पाटील | F.Y.B.A | 1122 | K.S. Patil |
| 23 | माधुरी महेश झावरे | F.Y.B.A | 1059 | [signature] |
| 24 | निकिता नरेश घुमाळ | F.Y.BA | 1060 | [signature] |
| 25 | अंजली परशुराम घुमाळ | F.Y.B.A | 1162 | [signature] |
| 26) | साक्षी मोहन घुमाळ | F.Y.Bcom | 4023 | [signature] |
| 27) | समिक्षा गणेश झावरे | F.Y.Bcom | 4022 | [signature] |
| 28) | शिवानी रघुनाथ मोरे | F.Y.B.A | 1187 | [signature] |
| 29) | प्रतिक्षा [illegible] पाटील | F.Y.B.A | 1005 | [signature] |
| 30) | हर्षदा रामचंद्र शेगाडे | F.Y.B.A | 1166 | [signature] |
| 31) | रिमा विनायक टापरे | F.Y.B.A | 1058 | [signature] |
| 32) | ऋतुजा [illegible] मोकल | F.Y.BA | 1151 | [signature] |
| 33) | मानसी नंदकुमार झावरे | F.Y.B.Com | 4041 | M.N. Zaware |
| 34) | प्रणोती महेश्वर शिंदे | F.Y.B.Com | 4042 | P.M. Shinde |
| 35) | Shivanjali Vinayak Thakur | S.Y.B.A | 2083 | Shiv Thakur |

स्पर्धा प्रमुख ०१. ०२.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 36) | श्रवण शेषनाथ पाटील | S.Y.B.A. | 2106 | S.S.patil. |
| 37) | कृष्णा हिरामण दिवे | S.Y.B.A. | 2082 | [signature] |

|| ज्ञानदीपेन भास्वत: अज्ञानतम नाशयेत् ||

Prabhakar Patil Education Society's

# Arts, Commerce & Science College

Veshvi, Tal. Alibag, Dist. Raigad. Pin- 402209

Affiliated To University Of Mumbai ( AFF/RECOG/3838 of 2003)

Phone : No. 8380055635
www.pnpcollege.edu.in

E-mail- pnpcollege11@gmail.com
info@pnpcollege.edu.in


Outward No. : PNP/ACS/2090/2023

Date : 23/02/2023

प्रति,

मा.डॉ.अनिल बांगर,

मराठी विभाग,

लक्ष्मी शालिनी महाविद्यालय, पेझारी

विषय - मराठी भाषा दिनास आपण प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित राहिल्याबद्दल आभार पत्र

महोदय,

आपण दिनांक ०२ मार्च २०२३ रोजी कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाप्रित्यर्थ साजरा करण्यात आलेल्या मराठी भाषा दिनानिमित्त आमच्या सर्व विद्यार्थ्यांना मराठी भाषाविषयक मार्गदर्शन केलेत. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करुन विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधलात, याबद्दल महाविद्यालयाच्या मराठी वाङ्.मय मंडळातर्फे आपले हार्दिक आभार! वेळोवेळी आपले आम्हाला असेच सहकार्य मिळावे.

आभारी आहोत.

VC PRINCIPAL
Prabhakar Patil Education Society's
Arts, Commerce & Science College
Veshvi - Alibag

|| ज्ञानदीपेन भास्वतः अज्ञानतम नाशयेत् ||

Prabhakar Patil Education Society's

# Arts, Commerce & Science College

Veshvi, Tal. Alibag, Dist. Raigad. Pin- 402209

Affiliated To University Of Mumbai ( AFF/RECOG/3838 of 2003)

Phone : No. 8380055635
www.pnpcollege.edu.in

E-mail- pnpcollege11@gmail.com
info@pnpcollege.edu.in

Outward No. : PNP/ACS/2089/2021

Date : 23/02/2021

प्रति,

मा.डॉ.अनिल बांगर,

लक्ष्मी शालिनी महाविद्यालय, पेझारी

विषय - मराठी भाषा दिनास आपण प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित रहाण्याबद्दल निमंत्रण..

महोदय,

२७ फेब्रुवारी या दिनी कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाप्रित्यर्थ सर्वत्र मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात येत असतो. या अनुषंगाने महाविद्यालयाच्या मराठी वाड्.मय मंडळातर्फे मराठी भाषा दिन गुरुवार दिनांक ०२ मार्च २०२३ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या प्रसंगी आपण प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

आभारी आहोत.

I/C PRINCIPAL
Prabhakar Patil Education Society's
Arts, Commerce & Science College
Veshvi - Alibag

दि०

# ...यार्थी नाव नोंदणी

DATE :
PAGE NO.

| विदयार्थ्यांचे नाव | वर्ग | रोल नं | सही |
|---|---|---|---|
| ...वात विजय मोरे | | | |
| अनिल भिकू सेठ राठोड | F.Y.B.A | 1092 | [illegible] |
| 2) विराज संतोष जोशी | F.Y.B.A. | 1044 | A.B Rath |
| 3) विहागा संजयकुमार पाटील | F.Y. B.Com | 4058 | B.Joshi |
| 4) महेश संतोष गडवे | F.Y.B.com | 4104 | V.S.Patil |
| 5) फाईक न. सैय्यद. | F.Y.B.A | 1019 | M.S.Gadve |
| 6) यशेश विकास म्हात्रे. | F.Y.B.A. | 1161 | Faaik |
| 7) जयदिप दिपक म्हात्रे | F.Y.B.A. | 1016 | [illegible] |
| 8) सिद्धेश संदिप झावरे | F.Y.B.A | 1004 | J.P.Mhatre |
| 9) संदेश संतोष झावरे | F.Y.BA. | 1068 | [illegible] |
| 10) जान्हवी श्रीकांत गावंड | F.Y.B.A | 1188 | [illegible] |
| 11) संस्कृती महेश खालावकर | F.Y.Bcom | 4027 | J.S.Gavand |
| 12) दिव्या उदय जगताप | F.Y.Bcom | 4076 | S.M.Salavkar |
| 13) सिद्धी कैलास मोरे | F.Y.Bcom | 4030 | [illegible] |
| 14) प्रियंका विजय नाईक | F.Y.Bcom | 4054 | S.k.more |
| 15) स्मृती दयानंद पाटील | f.y.Bcom | 4055 | [illegible] |
| 16) सानिया राजीव खरसंबळे | F.Y.B.com | 4037 | S.D.Patil |
| 17) महिमा धनंजय कोलेटकर | F.Y.B.com | 4053 | S.R.Kharsamble |
| 18) किमया निलेश गोंधळी | F.y.B.com | 4074 | Mkoletkar |
| 19) निर्जला हेमंत पाटील | F.Y.B.com | 4100 | Gondhali |
| 20) रिया राजेश भुंजाळ | F.Y.B.Com | 4077 | [illegible] |
| 21) हर्तिका सुभाष पाटील | F.Y.B.A | 1050 | Bhunjal |
| 22) धनश्री श्रीकांत गायकवाड | F.Y.B.A | 1051 | Patil |
| 23) जान्हवी कमलाकर पवार | F.Y.B.A | 1099 | D.S.gaikwad |
| 24) कृतिका संदेश पाटील | F.y.B.A | 1158 | JKPawar |
| 25) माधुरी महेश झावरे | F.Y.B.A | 1122 | K.S.Patil |
| 26) सामिक्षा गणेश झावरे | F.Y.B.A | 1059 | [illegible] |
| 27) साक्षी मोहन धुमाळ | F.Y.Bcom | 4022 | Zaware |
| 28) निकिता नरेश धुमाळ | F.Y.Bcom | 4023 | Dhumal |
| 29) सेजल परशुराम धुमाळ | F.Y.B.A | 1060 | Dhumal |
| 30) वैष्णवी संदिप नागावकर | F.Y.B.A | 1162 | [illegible] |
| 31) शिवानी राधेश्याम मौर्या | F.Y.B.A. | 1078 | [illegible] |
| 32) हर्षदा रामचंद्र हेंगाडे. | F.Y.B.A | 1187 | [illegible] |
| 33) प्रतिक्षा तुळशीदास पाटील | F.Y.B.A | 1166 | Hengade |
| 34) अनुजा मच्छिंद्रनाथ भोकरे | f.y.B.A | 1005 | P.Patil |
| | f.y.B.A | 1151 | [illegible] |




# मराठी विभाग

## ॥शिलालेख लेणी॥

### विशेषांक

२७ फेब्रुवारी २०२३

॥जागतिक मराठी भाषा दिन॥



प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे

**कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वेश्वी**

ता. अलिबाग, जि. रायगड




धार
सरी
भाषा दिन !!




# मराठी विभाग

## ॥शिलालेख लेणी॥

### विशेषांक

२७ फेब्रुवारी २०२३

॥जागतिक मराठी भाषा दिन॥



PNP

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे

**कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वेश्वी**

ता. अलिबाग, जि. रायगड

# मराठी विभागाची आद्य शिलालेखास भेट



मराठी भाषा दिनानिमित्त मराठी विभागाचा शिलालेख आणि लेणी विशेषांक निघणार असल्याने मराठी विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी आक्षी येथील आद्य शिलालेखास भेट दिली. तेथे शिलालेखांचे प्रत्यक्ष निरीक्षण करुन त्या शिलालेखाची महती प्र.प्राचार्य डॉ.ओमकार पोटे, विभागप्रमुख प्रा.नम्रता पाटील यांनी विद्यार्थ्यांना समजावून दिली.

॥ राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ॥
॥ प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥

# सर्जनशीलतेच्या वाटेने...

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी वाङ्.मय मंडळातर्फे शिलालेख आणि लेणी विशेषांकाचे अनावरण होताना अतीव आनंद होत आहे. या महाविद्यालयाचा मराठी विभाग मराठी भाषा दिनानिमित्त प्रतिवर्षी असे अभिजात उपक्रम राबवत असतो, याचा मनस्वी आनंद होतो. या आधी विभागातर्फे निघालेले सुप्रसिध्द लेखक पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी निमित्त पु.ल.विशेषांक, नक्षत्रांचे देणे कवीमालिका विशेषांक, मराठीतील विविध बोली विशेषांक आणि आत्ताचा हा शिलालेख आणि लेणी विशेषांक ही एकामागोमाग एक अशी निघालेली विशेषांकाची मालिका हे मराठी विभागाच्या यशस्वीतेचे फलित आहे.

प्राचीन मराठी साहित्याचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, शिलालेख, ताम्रपट, भूर्जपत्रे, बखरी यांना मराठी इतिहासामध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. त्याचप्रमाणे गड, किल्ले, लेणी, मंदीरे, विहारे, स्तूप हे आपल्या मराठी संस्कृतीचे वैभव आहे. त्यामुळे त्यांना नामशेष करुन चालणार नाही. तर त्यांचे आपण सर्व मायबोली सुपुत्रांनी संवर्धन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. प्रत्येक गावागावामध्ये एक तरी प्राचीन मंदीर असतेच. या प्राचीन मंदीराच्या लगतच अनेक वर्षांपासून शिळेवर कोरीव काम केलेले शिलालेख, भिंतींवर केलेले चिन्हांकीत कोरीवकाम, पायथ्यालगत दगडांवर असलेल्या विविध सांकेतिक भाषा, जून्या मूर्तीवरील सुबक नक्षीकाम, विशिष्ट अशी मंदीराची वा घुमटाची रचना या काळानुसार कालबाह्य ठरत चाललेल्या प्राचीन वस्तू पाहिल्या की मन विषण्ण होते. उदाहरणच घ्यायचे झाले तर कोणत्याही गावामध्ये असणा-या एखाद्या प्राचीन शिवालयाचे घेता येईल. या शिवालयाच्या आसपास कुठेतरी लाकडवर अथवा शिळेवर प्राच्य लिपीतील मजकूर दृष्टिस पडेल. रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यामध्ये अशी अनेक प्राचीन शिवालये दिसून येतील. नागांव येथील रामेश्वर मंदिराच्या पायरीवर कोरलेला शिलालेख हा त्या काळातील परिस्थितीची साक्ष देईल.

प्राचीन इतिहासाचे संशोधन ही एक परिश्रम साध्य कला आहे. कारण इतिहासाचा इतिहास कधी नव्याने समोर येईल हे याच साधनांच्या संशोधनावर आधारीत असते. याचे उत्तम उदाहरण आपल्याला आक्षीच्या शिलालेखाचे घेता येईल. प्राचीन मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये आद्य शिलालेख म्हणून कर्नाटक येथील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या पायथ्यावर लिहीलेला शिलालेख मानला जात होता. त्यावर असलेला कालावधी हा १११६ – १११७ या काळचा होता अशी त्यावर नोंद होती. परंतु काळाच्या ओघात रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यामधील आक्षी येथील शिलालेखावर शके ९३४ अशी नोंद आल्याने मराठीतील आद्य शिलालेखाचा मान आक्षीच्या शिलालेखाकडे गेला. आक्षीच्या गध्देगाळीचे इतिहासकार शं.गो.तुळपुळे यांसह अनेक इतिहासकारांनी संशोधन करुन तत्कालीन इतिहासाचा लेखा जोखा मांडण्याचा प्रयत्न केला आणि आक्षीचे नाव प्राचीन

मराठीच्या इतिहासामध्ये अभ्यासक आणि संशोधकांच्या सर्वांपुढे आले, ही निश्चितच आपणा सर्वांसाठी

अभिमानास्पद बाब आहे. परंतु असे असले तरी शासनाच्या अनेक वर्ष रखडलेल्या संवर्धनाच्या निर्णयामुळे या शिलालेखाला उन, वारा, पावसाच्या मा-यामध्ये खितपत पडावे लागले, हे ही माठे दुर्दैव म्हणावे लागेल. गतवर्षी शासनाने पुढाकार घेऊन या आद्य शिलालेखाचा तत्कालीन ऐवज संवर्धित करण्याचा निर्णय घेतला आणि आता आपल्याला तिकडे शिलालेखाच्या भोवती सुंदर वास्तू पहावयास मिळते. या आद्य शिलालेखाचे महत्त्व मराठीच्या विद्यार्थ्यांना समजावे, लेणी म्हणजे नेमके काय? त्याचे संवर्धन करणे का आवश्यक आहे? यावर आमच्या पी.एन.पी. महाविद्यालयाने प्रकाश टाकावा, असे अनेक दिवस मनामध्ये होते. एकदा मराठी विभागाची सभा सुरु असताना या चर्चेवर उहापोह झाला आणि मराठी भाषा विशेषांकासाठी एक सुंदर विषय समोर आला.

या विशेषांकाची ही संकल्पना संस्थेच्या कार्यवाह मा.सौ.चित्रलेखा पाटील यांना अतिशय आवडली. मॅडमनी लगेचच हा अंक बनण्यासाठी पाठिंबा दिला. त्याबद्दल मॅडमचे आभार. विशेषांक तयार करताना विभागप्रमुख प्रा.नम्रता पाटील आणि प्रा.रुपाली पाटील यांच्या मेहनतीला मानावेसे वाटते. कारण अखेर एका विभागाचा निघणारा अंक हा त्यांच्यासाठी नवनिर्मितीचा आनंद असतो. त्याबद्दल द्वयींचे मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा. विशेष कौतुकाची बाब म्हणजे अनेक विद्यार्थ्यांनी यामध्ये सक्रीय सहभाग घेतला आणि आपल्या मराठी विभागाचा अंक म्हणून त्यांचा उत्फूर्त सहभाग हा माझ्यासाठी अनमोल आहे. विद्यार्थ्यांबरोबरच अनेक वेगवेगळ्या विषयाच्या प्राध्यापकांनीसुध्दा यामध्ये आपला अमूल्य सहभाग नोंदविला, ही आमच्या महाविद्यालयाची जमेची बाजू आहे. या सर्वांमुळेच अंकास पूर्णत्व प्राप्त झाले. हा उत्साह पाहून मलाही एक लेख लिहीण्याची प्रेरणा यामुळे मिळाली. हा ठेवा आपण मराठी भाषा दिनी लोकार्पण करीत आहोत आणि दरवर्षी विविध विषयांच्या परीघाचे नवनवीन आयाम पादाक्रांत करीत सर्जनशीलतेच्या वाटेने महाविद्यालयाचा मराठी विभाग पुढे पुढे वाटचाल करीत आहे, हे या महाविद्यालाचा एक जबाबदार घटक म्हणून मला निश्चितच सुखदायी, फलदायी वाटते. शेवटी संत तुकोबा म्हणतात त्याप्रमाणे-

**"आम्हा घरी धन। शब्दांचीच रत्ने,**
**शब्दांचीच शस्त्रे यत्ने करु।**

**शब्दे वाटू धन जनलोका । तुका म्हणे पाहा**
**शब्दची हा देव।।"**

डॉ.ओमकार विनायक पोटे
प्र.प्राचार्य
दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३

# मराठी भाषा गौरव दिन निमित्ताने.......

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे आजच्या २७ फेब्रुवारी २०२३ या शुभ दिनी मराठी शिलालेख आणि लेणी विशेषांक पुस्तक रूपाने प्रकाशित करताना आम्हाला अतीव आनंद होत आहे.

आज २७ फेब्रुवारी म्हणजेच मराठी साहित्य वर्तुळातील रसिकांच्या सर्वोच्च स्थानी असलेले कवी कुलगुरू कुसुमाग्रज अर्थात विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिन.....! या दिनाचे

औचित्य साधून गेली अनेक वर्ष मराठी विभाग एखादा विषय घेऊन विशेषांक म्हणून प्रकाशित करतो. याही वर्षी आमच्या संकल्पनेला मूर्त रूप देणारे आमचे विद्यार्थी प्राध्यापक वृंद यांच्या प्रयत्नांमुळे आणि या सर्वांच्या लेखन अभिसरणातून आमची मायमराठीची मराठी शिलालेख आणि लेणी विशेषांक ही पुस्तिका सजली आहे. या सर्वांच्या योगदानामुळेच आम्ही हे विशेषांक प्रकाशित करू शकलो.

मराठी भाषेचे लौकिक असलेले प्राचीन शिलालेख, ताम्रपट,लेणी यामुळेच खऱ्या अर्थाने मराठी भाषा समृद्ध आणि सुजनशील आहे

म्हणूनच विद्यार्थी,शिक्षक,अभ्यासक,संशोधक, चिकित्सक, समीक्षक या सर्वांचीच झोळी या विशेषांकाच्या ज्ञानरूपी सागराने प्रवाहित होईल ही सदिच्छा....!

प्रा. नम्रता नितीन पाटील
मराठी विभाग प्रमुख

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. गांधरपाले लेणी शिलालेख | साजिरी राजेंद्र जुईकर |
| २. शिलालेख | सुयोग संतोष इंदुलकर |
| ३. कार्ले लेणी | फाईक नदीम सैय्यद |
| ४. भाजे लेणी | प्रतिक्षा तुळशीदास पाटील |
| ५. आक्षी शिलालेख | महेश संतोष गडवे |
| ६. शिलालेखांचे मराठी साहित्याला योगदान | प्रा.डॉ. ओमकार विनायक पोटे |
| ७. मराठी भाषेतील काही दुर्मिळ शिलालेख | प्रा.नम्रता नितिन पाटील |
| ८. निसर्गाच्या सानिध्यातील गांधारपाले | प्रा. रूपाली दिलीप पाटील |
| ९. शिलालेख | प्रा. वृषाली प्रवीण घरत |
| १०. भारतीय शिलालेखाचे ऐतिहासिक महत्त्व | प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे |
| ११. मराठीतील पहिला शिलालेख | प्रा. साईनाथ नरेश पाटील |
| १२. प्राचीन बौद्ध लेणी कुडे | प्रा.शिल्पा स्वप्नील दाभणे |
| १३. पांडव (पांडू) लेणी - नाशिक | प्रा. योगिता नंदकुमार पाटील |

# १. गांधरपाले लेणी शिलालेख

साजिरी राजेंद्र जुईकर
वर्ग –एफ. वाय. बी. ए.रोल नं -१०९१
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वि-अलिबाग



डोंगरात कोरलेल्या एकामागोमाग एक अशा अठ्ठावीस लेण्यांचा समूह म्हणजे गांधारपाले ही बौद्ध लेणी होय. रचना जवळपास सारखीच असलेल्या या लेण्यांच्या जवळ पोहोचल्यावर महाड शहर, चांभारगड, सावित्री नदी आणि सभोवतालची हिरवी शेती आणि झाडी असा सुंदर देखावा दिसतो. हे एक प्राचीन व ऐतिहासिक महत्वपूर्ण स्थळ आहे. ही लेणी रायगड जिल्ह्यातील महाड जवळ गांधारपाले या गावातील डोंगरावर आहे. ही लेणी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्याच्या महाड तालुक्यातील बौद्ध लेणी आहे. राष्ट्रीय महामार्ग ६६ वर महाडच्या उत्तरेस ३ किमी अंतररावर असलेल्या डोंगरात कोरलेली आहेत. हा एकूण ३० लेण्यांचा समुह असुन ३ चैत्यगृह व १९ विहार आहेत. लेणे क्र.१ मधे ५३ फुट लांब व ८ फुट रुंद ओसरी आहे. गर्भगृहात गौतम बुद्ध यांची मुर्ती व धम्मचक्र कोरलेली आहेत. लेणे क्र.२१ में गौतम बुद्ध यांची बसलेली मुर्ती,त्यांचे शिष्य व हरिणाची चित्र कोरली आहेत. ही लेणी तीन थरांमध्ये कोरलेली आहेत. ही लेणी कंभोग वंशातील विष्णू पुलित या राजाने खोदलेली आहेत. पुलित राजनावावरून पाले हे नाव रूढ झालं असावं असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. या लेणी समूहात तीन ब्राह्मी भाषेतील शिलालेख आहेत.या लेण्यांमध्ये पाली भाषेत लिहिलेले शिलालेख आहे.

येथिल शिलालेखा नुसार ही लेणी बौद्ध धर्मीय कंभोज वंशिय राजा विष्णू पुलित यांच्या कारकीर्दित ई.स. १३० च्या आसपास निर्माण केली गेली. येथील शिलालेखा नुसार ई.स. बौद्ध संघाला सावकारांकडुन देणगी व जमिनी मिळाल्याची नोंद आहे. ऐतिहासिक व पर्यटन या दोन्हि दृष्टिने ही लेणी महत्त्वपूर्ण आहेत. राजा पुलित याच्या नावावरून पाले हे गावाचे नाव रुढ झाले. डोंगरावर कोरलेली ही लेणी महामार्गाला लागुनच असुन वर जायला पायरी मार्ग आहे.

पायथ्यापासून साधारणपणे ५०-६० मीटर उंचीवर ही लेणी आहे. लेणी समूहात एकूण २८ लेणी आहेत व त्यात ३ चैत्यगृह आणि १९ विहार आहेत. पुरातत्त्व विभागाने लावलेल्या फलकाजवळ उतरल्यानंतर लगेच लेण्यांकडे जाणाऱ्या पायऱ्या आहेत. या पायऱ्या चढून गेल्यानंतर आपण लेण्यांपर्यंत पोहोचतो. पायऱ्या चढण्यासाठी सुमारे २०-२५ मिनीटे लागतात.



हे एक चैत्यगृह असून याला सात कमानी आहेत. लेण्याला सहा खांबी ओसरी असून ओसरीच्या मागे भव्य दालन आहे. सहा खांबांपैकी फक्त एकच खांब पूर्णपणे कोरलेला आहे, बाकीचे पाच अर्धवट आहेत. दालनात जाण्यासाठी तीन दरवाजे आहेत. दालनात उजेड येण्यासाठी दोन खिडक्यांची रचना केलेली आहे. दालनात प्रवेश केल्या नंतर आपल्याला डावीकडच्या भिंतीत चार, तसेच समोरच्या भिंतीत मध्यभागी गर्भगृह आणि गर्भगृहाच्या शेजारी दोन्ही बाजूना दोन दोन खोल्या आहेत. या भव्य दालनाला सर्व बाजूनी ओटा खोदलेला आहे. गर्भगृहाच्या मध्यभागी बुद्धमूर्ती तोरणात बसवली आहे. मूर्तीची बरीच नासधूस झालेली आहे. मूर्तीच्या आसनाखाली धम्मचक्र, हरणे, चवरीधारी आणि आकाशात उडणारे यक्ष दिसतात. ही मूर्ती ज्या प्रस्तरात कोरली आहे त्याच्या मागील भागात आसनस्थ बुद्धमूर्तीचा आराखडा दिसतो. मूर्ती खोदण्यापूर्वी तिचे रेखाचित्रे कोरण्याची पद्धत महाराष्ट्रातील कोणत्याही लेण्यात बघावयास मिळत नाही.

# २. शिलालेख

सुयोग संतोष इंदुलकर
रोल नं - ३०४१
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वि-अलिबाग

शिलालेख म्हणजे दगडावर अथवा शिळेवर कोरून ठेवलेला मजकूर. लिखित मजकूर अनंत कालपर्यंत टिकून रहावा म्हणून तो दगडी शिळेवर कोरून ठेवायची प्रथा आस्तित्वात होती. पुरातत्त्व शास्त्रात याला पुराभिलेख असे म्हटले जाते.[१] राजकीय, धार्मिक व सामाजिक आणि ऐतिहासिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने असे कोरीव लेख अत्यंत उपयुक्त असतात.[२] शिलालेखातील व्यक्ती नावाच्या आणि अक्षरांच्या वळणावरून त्यांचा काल ठरविता येतो.

प्राकृत, पाली, संस्कृत, वा अन्य आर्य- भारतीय भाषांमध्ये लिहिलेली शिलालेख आढळून येतात.सर्वात जास्त शिलालेख हे ऐतिहासिक प्राचीन बौद्ध लेण्यात सापडतात. या लेखांमधील मजकूर अनेकदा राजाज्ञा किंवा दानवर्णनपर असतो. ठाणे जिल्ह्यातील सोपारा येथे किंवा विदर्भाच्या चंद्रपूर जिल्ह्यातील देवटेक येथे सापडलेले मौर्य अशोकाचे शिलालेख हे महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन शिलालेख होत

इतिहासातील पाऊलखुणा जपल्याशिवाय वर्तमान कळत नाही आणि भविष्यही घडविता येत नाही. मात्र गौरवशाली इतिहास सांगणारे शिलालेख आणि वीरगळ काळाच्या ओघात नष्ट होत आहेत. या शिललालेखांमधून संबंधित परिसराचा इतिहास समजत असतो. असेच पुरातण शिलालेख दुर्लक्षित आहेत. ऐनापूर (ता. गडहिंग्लज) येथे अनेक पुरातन शिलालेख सापडतात. येथे काही वर्षापूर्वी सापडलेला एक शिलालेख अतिशय पुरातन आहे. सध्या तो ऊन, पाऊस व वारा यांच्यापासून बचावलेला असला तरी स्थानिक लोक त्याचे पूजन करतात. त्यावर हळद, कुंकू, तेल वाहतात. त्यामुळे त्याच्यावरील अक्षरे वाचणे कठीण होत आहे.

**इतिहास प्रसिद्ध "मठगावचा शिलालेख "**

कुडाळ-वेंगुर्ले रस्त्यावर कुडाळपासून १६ कि.मी. अंतरावर आणि वेंगुर्लेपासून ३ कि.मी. अंतरावर मठ हे इतिहासप्रसिध्द गाव लागते. आज हे गांव कोकणातील एखाद्या सर्वसामान्य खेडे गावाप्रमाणेच प्रथम दर्शनी दिसेल, परंतू प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासात या गावाला फार मोठे महत्त्व आहे.

कुडाळ प्रातांच्या प्राचीन इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व वेंगुर्ले तालुक्यातील होडावडे या गावी घडले. रणवीरांचा हा गाव! या होडावडे गावाचा आजचे 'मठ' गांव हा एक भाग होता. या गावात इतिहासप्रसिध्द मांगल्याचा मठ आहे. सावंतवाडी संस्थानचे राजे खेम सावंत यांचा

मूलपुरुष 'मांग' सावंत यांची समाधी (इतिहासात अशा समाधीस वीरगळ किंवा 'छत्री' या नावाने संबोधले गेले आहे) म्हणजेच हा मांगल्याचा मठ !

'मठ' गावात शिवलिंगाची शेजारी शेजारी अशी दोन देवालये आहेत. त्यातील एक देवालय मोठे आणि प्राचीन आहे ते स्वयंभू श्रीशंकराचे देवालये आहे. त्याच्या बाजूलाच एक छोटेसे देवालय आहे. त्यास 'मांगल्याचे देवालय' म्हणून ओळखले जाते. या मांगल्याच्या देवालयात भिंतीला टेकवून उभे ठेवलेले सहा पाषाण आहेत. त्यातील एका पाषाणावर शके १३१९ चा एक लेख (शिलालेख) दिसून येतो. तोच इतिहासप्रसिध्द मठगावचा "शिलालेख" होय. सौजन्य : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किल्ले

अक्षीचा शिलालेख हा शा.श. ९३४ म्हणजेच इ.स. १०१२ मधील मराठीतील पहिला शिलालेख आहे हा शिलालेख रायगड जिल्ह्यातील अलिबागजवळील अलिबाग-चौल रस्त्यावरील अक्षी या गावात आढळलेला आहे. पुरातत्वज्ञ डॉ. शं.गो. तुळपुळे यांच्या संशोधनाप्रमाणे तो मराठीतील पहिला शिलालेख आहे. अक्षीचा शिलालेख मराठीतील आद्य शिलालेख असून त्यावर शके ९३४ म्हणजेच इ.स. १०१२ असा स्पष्ट उल्लेख आहे. शिलाहारवंशीय राजा पहिला केसीदेवराय याचा प्रधान भइर्जू सेणुई याच्या काळात म्हणजे शिलाहार काळात कोरलेला हा शिलालेख असून त्याने देवीच्या बोडणासाठी नऊ कुवली धान्य दिल्याचा यात उल्लेख आहे. हा शिलालेख संस्कृत-मराठी मिश्र देवनागरी लिपीतील असून नऊ ओळींचा आहे. त्या नऊ ओळींच्या वर चंद्र-सूर्य कोरले आहेत. खाली शापवाणीचे चित्र कोरले आहे.


जगी सुख नांदो.पश्चिम समुद्राधिपती श्री कोकणचक्रवर्ती, श्री केसीदेवराय याचा महाप्रधान भइर्जू सेणुई याने शक संवत ९३४ प्रभव संवत्सर अधिक कृष्ण पक्ष शुक्रवार या दिवशी भइर्जूने देवीच्या बोडणासाठी नऊ कुवली धान्य नेमून दिले.

मराठी भाषेच्या उगम इतिहासातील सज्जड पुरावे म्हणजे कोरीव ताम्रपट आणि शिलालेख होत. त्या सर्वांवर काळाची नोंद नसली त्यांच्या अक्षरांच्या वळणावरुन त्या काळाची नोंद होऊ शकते. मराठी भाषेतील पहिला शिलालेख हा जैन दिगंबर पंथीय श्रवणबेळगोळ येथील बाहुबलीच्या पायथ्याशी असलेला शालिवाहन शके १०३८-३९ म्हणजेच इ.स. १११६-१७ सालातील " श्री चावुण्ड राजे करवियले श्री गंगराजे सुत्ताले करवियले " अशा नोंदीचा मानला जात होता परंतु शं.गो. तुळपुळे यांच्या संशोधनाप्रमाणे अक्षीचा शिलालेख हा पहिला शिलालेख ठरतो " पूर्वी हा 'दगड' रस्त्याच्या चिरणीत (गटारात) पडलेला होता. आज तो अक्षी ग्रामपंचायती शेजारी उभा आहे.

# ३. कार्ले लेणी

फाईक नदीम सैय्यद
वर्ग – एफ. वाय. बी. ए. रोल नं – ११६१
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वि-अलिबाग

कार्ले लेणी हा १६ बौद्ध लेण्यांचा गट असून त्यातील एक चैत्यगृह व इतर विहार आहेत. ही लेणी प्राचीन काळी 'वलुरक' नावाने ओळखली जात असे. बुद्धांच्या जीवनावर आधारलेल्या या दगडी गुंफा पुणे जिल्ह्यात मळवलीपासून (लोणावळा) ४-५ कि.मी. अंतरावर आहे. ६ किलोमीटर अंतरावर लोणावळ्यानजीक आहेत. येथील चैत्यगृहाचे स्थापत्य शिल्पे सुंदर आहेत. कार्ले गुंफा ह्या बोरघाटात स्थित आहेत. बोरघाट सातवाहन कालीन प्राचीन बंदरे कल्याण आणि सोपारा या ठिकाणांहून तेर या प्राचीन ठिकाणास जाण्याच्या मार्गावर आहे. इ.स.पू. १ ले शतक ते इ.स. ५ वे शतक या काळात ही लेणी खोदली गेलेली आहे. भारत सरकारने या लेणीला दिनांक २६ मे, इ.स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे.[१] कार्ला गुंफांमध्ये कदाचित सर्वात जास्त मोठ्या संख्येने चैत्य सभागृह आहेत.



हा लेणी सोळा लेण्यांचा हा गट आहे व त्यात एक चैत्यगृह आणि इतर विहारे आहेत. चैत्यगृहाच्या दाराशीच डाव्या हाताला एक सिंहस्तंभ कोरलेला आहे. भारतात अशोकाने असे स्तंभ उभे केले होते. या मालिकेतील सारनाथच्या धर्तीवर हा इथला सिंहस्तंभ कोरला आहे. हा स्तंभ ४५ फूट उंचीचा आहे. त्याची बैठक वर्तुळाकार, आणि अंग सोळा कोनांमध्ये घडवलेले आहे. या स्तंभाच्या अग्रभागी एक वर्तुळाकार कळस दिसून येतो. त्यावर आमलक, हर्मिकेचा चौथरा आहे. या संचावर चार सिंहाची आकृती कोरलेली आहे. या स्तंभाचा करविता 'महारठी अग्निमित्रणक याच्या दातृत्वाचा भाषेतील लेख दिसतो.

चैत्यगृहाच्या उजव्या बाजूसही पूर्वी स्तंभ आणि त्यावर चक्र असावे असे अभ्यासकांना वाटते. याची एक सूचक शिल्पाकृती चैत्यगृहातील एका खांबावर काढलेली आहे. इथे सिंह आणि चक्र असलेल्या खांबांमध्ये स्तूप दिसत आहे. याशिवाय या चैत्यगृहाचे कान्हेरीच्या चैत्यगृहाशी साम्य असल्याचे दिसते कारण तेथेही असे दोन्ही स्तंभ दाखवलेले आहेत.

चैत्यगृहाबाहेर सज्जा कोरलेला आहे. येथे मिथुन शिल्पाच्या जोडया, हत्तींचे थर, गौतम बुद्धांचे त्यांच्या अनुयायांसह असलेले शिल्पपट, चैत्यकमानी आदि गोष्टी दिसून येतात. मिथुन शिल्पांतील स्त्रियांच्या डोक्यावर पदर घेतलेला दिसतो. तसेच कमरेला शेला आहे. पुरुषाने धोतर आणि डोक्यावर मुंडासे घातले आहे. स्त्रियांच्या हातात बांगडया आहेत. तसेच पायातील विविध आकाराचे तोडे, कमरेवरच्या मेखला, गळ्यातील मण्यांचे हार, कर्णफुले, कपाळावरची कुंकू अशी आभूषणे दिसून येतात. इथे असलेल्या या मिथुन जोडया तत्कालीन राज्यकर्त्यांच्या किंवा या लेण्यास दान देणाऱ्यांच्या असाव्यात असाही एक तर्क आहे.यातील एक जोडी अग्नीमित्र आणि विरावती ( इरावती ) यांची आहे . सोबत एकलविरा या दासीचे शिल्प आहे. सज्ज्याच्या दोन्ही बाजूस अनेक मजली प्रासादांचे देखावे आहेत. याच्या तळाशी दोन्ही बाजूला तीन हत्तींची शिल्पे कोरलेली आहेत. यातील डाव्या बाजूकडील हत्तींवर पुढे गौतम बुद्धाच्या मूर्तीही कोरलेल्या आहेत.

चैत्यगृहाच्या सज्ज्यात या लेण्याच्या करवित्याचा लेख आहे. 'वेजयंतितो सेठीना भूतपालेन सेलघरम परिनिठापितम् जंबुदिपम्ही उतमम्' वैजयन्तिचा श्रेष्ठी भूतपाल याने तयार केलेले हे लेणे जम्बुद्वीपात उत्कृष्ट आहे, असा याचा अर्थ होतो.

कार्ल्याच्या या लेण्यांमध्ये ब्राह्मी लिपीतले ३५ लेख दिसून आले आहेत. यातील बहुतेक दानधर्म विषयक आहेत. या लेखातून तत्कालीन समाज, त्यांचे नातेसंबंध, रुढी-परंपरा, व्यापार-व्यवसाय, चलन असे अनेक विषय समजू शकतात. धेनुकाकट म्हणजे आजचे डहाणू, सोपारक (आजचे सोपारा), करिजक (कार्ल्याच्या उत्तरेला असलेले करंजगाव) प्रभास म्हणजे आजच्या काठेवाड भागातील प्रभासतीर्थ वैजयंती म्हणजे आजचे कर्नाटकमधील उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवासी अशा अनेक गावांचे उल्लेख या लेखांतून दिसून येतात. चैत्यगृहाच्या व्हरांडयाच्या भिंतीवरील एका लेखात 'मामालाहारे' हा शब्द आलेला आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेत एखाद्या ठरावीक गावांच्या प्रदेशास - प्रशासकीय भागास 'आहार' असे म्हणत. तर 'मामल' म्हणजे आजचे मावळ! मावळ तालुक्याचा हा सर्वात प्राचीन उल्लेख असावा. या लेखांमधून वढकी (सुतारकाम), गंधक (सुगंधी द्रव्याचा व्यापार) अशा काही व्यवसायांचीही ओळख होते.

# ४. भाजे लेणी

प्रतिक्षा तुळशीदास पाटील
वर्ग – एफ. वाय. बी. ए. रोल नं – 1005
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वि-अलिबाग


भाजे महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील आहे. हे गाव विसापूर किल्ल्याजवळ वसलेले असून याच्या. "आसपास लेनी आहेत. सरकारने भोज लेज्यांना भारत दिनांक २६ मे,ळ. स. १९०९ रोजी महराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून, लेणी घोषित केलेले आहे यात सुमोर आढळतात लेव्यांच्या मध्यभागी एक चैत्यगृह आहे उतरीत एकतीस बिहार दोन्ही बाजूंना पसरलेल आहेत. येथे चैत्य गवाक्षांच्या माळा आहेत त्यांना लागून कोरीव सज्जे बनवलेले आहेत. यातील काही सज्जांवर कोरीवकामातून जाती आणि पडल्याचा भास निर्माण केलेला आहे. वेदिकापद्धी वर नक्षीदार कोरीवकाम आहे. दगडात कोरून काढलेल्या कड्या आहेत या ठिकाणी गवाक्षातून युगुले कोरलेलीही दिसून येतात. येथे एक यक्षीणी कोरलेली आहे. या यक्षीणीच्या हातात धरलेले झाड आजही पाए दिसून येते. या कमानीवर एकूण १७२ छिद्रे पाडलेली आहेत. चैत्यगृह १७०८ मीटर लांब, ८.१३ मीटर रुंद आहे आणि ७.३७ मीटर उंच असे आहे. त्यात २७ अष्टकोनी खांब आणि मधोमध स्तूप आहे. यांवांदर कमळ, चक्र अशी चिन्हेही त्या खांबांवर कोरलेली दिसून येतात. एका ठिकाणी एक खुंटी आणि आणि त्या खुंटी ला अडकवलेला फुलांचा हार कोरलेला आहे. त्या ठिकाणी पाठीमागील स्तूपा च्या खांबांवर बुद्धाची पुसटशी चित्रे ही कोरलेली दिसून येतात.



चैत्यवाहाला लाकडी तुक्यांचे छत आहे. या तुव्यांवर ब्राम्ही लिपीतील हे लेख यात आढळले आहेत इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात भाजे लेणी कोरण्यास सुरुवात झाली असेल असे मानले जाते. त्यानंतर आठशे वर्षे म्हणजेच इसवी सन सहाया शतकापर्यंत लेणी निर्मितीची प्रक्रिया सुरू होती येथील बिहार विनातून उमे राहिलेले आहेत. व त्यांच्या दानाचे लेख तेथे दिसून येतात. चैत्यगृहाच्या दक्षिण दिशेस स्वच्छ पाण्याचा सरा आहे येथील सूर्यलेणे प्रसिद्ध आहे या लेव्यात पौराणिक प्रसंगांचे पट, सालंकृत -शस्त्रधारी द्वारपाल, वन्यप्राण्याचे शर आणि चैत्य - स्तूपांचे नक्षीकाम कोरलेले आहे यात सूर्य आणि इंद्राचा मानला जाणारा देखावा आहे घोड्याच्या रथात त्याच्या

या पहिल्या शिल्पात चार स्थावर सूर्य स्वार होऊन चालला आहे, मागे पुढे त्याची पत्नी अथवा दासी आहे. त्यातील एकीने वर तर दुसरे। वासर रथाखाली काही असुर च्या छत्र धरले आहे. ढाळते आहे, त्यांच्या या तुडवले जात आहेत अनेकां- मते ही सूर्यदेवता, स्थातील त्या दोही त्याच्या

पत्नी संज्ञा आणि छाया तर श्याखाली तुडवला जाणारा तो सूर्याचा शत्रू राहू आहे. एका मतानुसार स्थाकट असणार शिल्प शक्राचे आहे. तर काहींना यामध्ये ग्रीकांच्या हेलिओस किंता रोमनांच्या अपोलो दिवलेचा भास होतो, असेही मानले जाते. भारतीय संगील फला संदर्भात हे लेणे अतिशय महत्वाचे आहे कारण येथे कोरलेल्या चित्रात तबला वाजवणारी एक नर्तिका दिसत आहे. या कोरीवकामाने तबला हा निश्चितपणे भारतात निर्माण झाला व किमान दोन हजार वर्षांपासून वापरात आहे हे सिद्ध होते.



# ५. आक्षी शिलालेख

महेश संतोष गडवे
वर्ग – एफ. वाय. बी. ए. रोल नं – 1019
प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वि-अलिबाग

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात चौल- रेवदंडाच्या रस्त्याला लागलं की पाच किमी अंतरावरच्या एका वळणावर आक्षी नावाचं एक टुमदार गाव लागतं वळणावरचं असलेल्या एका अर्वाचीन स्तंभावरून हे गाव आल्याची चाहूल लागते आक्षी व नागावं ही जुळी भावंड निसर्गरम्यता व ऐतिहासिकता यांच्या बाबतीत या दोन्ही गावात विलक्षण साम्य दिसून येते गेल्या काही वर्षापूर्वी आक्षी हे गाव आपल्या निसर्गरम्य साठी व स्वच्छ पांढऱ्या वाळूच्या समुद्रकिनाऱ्यासाठी प्रसिद्ध होतं मात्र गेल्या काही वर्षामध्ये आक्षीची ओळख मराठीतल्या पहिल्या शिलालेखाचे गावं म्हणून समोर आले आहे.



आक्षी गावात शिरणाऱ्या मुख्य रस्त्यास लागलं की काही अंतरावर सोमेश्वरांचे प्राचीन शिव मंदिर आहे याच परिसरात मराठीतला प्राचीन व पहिला शिलालेख पाहायला मिळतो एका गधेगळीवर कोरलेला हा शिलालेख ख देवनगरी लिपीत असून संस्कृत -मराठी मिश्रित आहे संशोधनाअंती शिलालेखाचा काल 16 मे 1012 असा ठरला याचा अर्थ 2012 असा या शिलालेखास हजार वर्ष पूर्ण झाली त्याकाळी संपूर्ण कोकण प्रांतावर शिलाहार नावाचे राजघराणे राज्य करीत होते हे शिलाहार राष्ट्रकुल नामक साम्राज्याचे मांडलिक असून यांच्या तीन शाखा अस्तित्वात होत्या त्यांना उत्तर कोकण शाखा दक्षिण कोकण शाखा व कोल्हापूर शाखा असे म्हटले जाते अक्षीचा शिलालेख हा उत्तर कोकणाचा शिलाहार शाखेचा राजा केशिदेवराज याच्या काळात हा शिलालेख असून केशिदेवाचा महाप्रधान भइर्जु सेनुई याने अक्षी गावातील नऊ कबुली धान्य देवीसाठी दिले असल्याचे या शिलालेखात नमूद करण्यात आले आहे या शिलालेखा बरोबरच या परिसरात आणखी एक यादवकालीन शिलालेख दिसून येतो सण 1291 सालचा हा शिलालेख यादव नुपती रामचंद्र देव यांच्या काळातला असून त्यांचे मांडले जाईदेव यांचा पुत्र ईश्वरदेव श्त्रिय याने 23 एक गधाण दान दिल्या असे

शिलालेखामध्ये नमूद करण्यात आले आहे अर्थात या दोन्हीही शिलालेखांमध्ये उल्लेख हे कालंबिका देवीची आहेत हे लक्षात यायला वेळ लागत नाही.

आक्षी गावातील कालंबिका माता मंदिर व सोमेश्वर महादेव हे शिव मंदिर समस्त अक्षिकारांची आराध्य दैवत आहे कालाम्बिका मंदिराचा जिर्णोद्धार झाला असून देवीचे सर्व उत्सव ग्रामस्थ भावी अतिशय उत्साहाने साजरे करत असतात प्रालंबिका मंदिराचा आवारात काही कालापूर्वी प्राचीन गजाल लक्ष्मीची मूर्ती आढळली आता तिची प्रतिष्ठापना ग्रामस्थांनी कालंबिका मंदिरा शेजारीच एक छोटेखानी मंदिर बांधून केली आहे याशिवाय सोमेश्वर महादेव शिवमंदिरही अतिशय प्रेक्षणीय आहे या मंदिराला प्रवेश धीरंगारी गंभीर व मंत्रमुग्ध वातावरण वातावरणात अनुभव देतो या मंदिरातील नदीची मूर्ती भली मोठी असून एवढी मोठी मूर्ती आजूबाजूच्या परिसरामध्ये क्वचित पाहण्या पहायला मिळते व पाहण्यास मिळते.

आक्षी गावाचे नाव कसे पडले असावे हा अभ्यासाचा विषय आहे अक्षय हा संस्कृत शब्द असून याचा अर्थ नेत्र किंवा अक्ष असा होतो प्रत्येक गावाच्या नावा मागे एक अर्थ दडलेला असतो ज्यावरून गावाचा गावाच्या अर्ध इतिहासाचा थोडाफार निष्कर्ष लावता येतो अक्षय हे गाव साखरखाडीच्या जवळच असल्याने व तेथून उत्तर व दक्षिणेकडील खूप मोठा प्रदेशाचा वापर पूर्वी मोठ्या प्रमाणात होत असावा आणि भौगोलिक दृष्ट्या अक्षय हे गाव अष्टागरांच्या मधोमध येत असल्याने अष्टांगरांची नेत्रे या आक्षी या गावात हे नाव मिळाले असल्यास अंदाज लावू शकतो अर्थात अक्षी गाव प्राचीन अष्टांगरांपैकी एक असल्याने तसेच या गावातल्या दोन प्राचीन शिलालेखांमुळे हे गाव फार पूर्वीपासून राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या वैभव संपन्न होते याची खात्री पटते.

# ६. शिलालेखांचे मराठी साहित्याला योगदान

**प्रा.डॉ. ओमकार विनायक पोटे**
मराठी विभाग
पी.एन.पी. कॉलेज, वेश्वी अलिबाग

"माझ्या म-हाठाचिं बोलु कवतुके। परिं अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळविन।।"

भागवत धर्माचा पाया रचणा-या संत ज्ञानेश्वर माऊलींचे हे मराठीबद्दल गौरवोद्गार कधीही आणि कुठेही वाचले की, मन अभिमानाने गहिवरुन येते. अचेतन मनाला सचेतन उर्जा या काव्यपंक्तीतून लाभते. आज कविकुलगुरु कुसुमाग्रज अर्थातच मराठी साहित्याची पताका अखंडपणे खांद्यावर मिरवणारे ज्येष्ठ साहित्यकार विष्णू वामन शिरवाडकर यांची जयंती. यानिमित्ताने आपण जागतिक मराठी भाषा दिवस ठिकठिकाणी उत्साहात साजरा करतो.

शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषा दिन साजरा व्हावा म्हणून गेले अनेक दिवस शासन सर्व स्तरांतून प्रबोधन व उद्बोधन करीत आहे. आज मराठी भाषा विषयक अनेक लावण्यवान शब्दरुपी लेख लिहिले जाऊन मराठी संस्कृती जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न होईल. पण मराठी संस्कृती जपणे म्हणजे नेमके काय? लेख किंवा एकदिवसीय उपक्रम करुन प्रश्न सुटणार नाहीत. तर आजच्या दिनापासून मराठी अस्मिता चळवळ जागृत ठेवण्याचा सर्वस्तरीय प्रयत्न करावयास हवा.

माझे आजचे लेखन हे रायगड जिह्यातील दुर्लक्षित शिलालेखांवर आधारीत आहे. अनेक शिलालेखांच्या लिपींचे प्राचीन मराठी साहित्याला बहुमोल योगदान आहे. म्हणूनच आजचा मराठी भाषा दिन मी या दुर्लक्षित शिलालेखांच्या लेखाने साजरा करीत आहे.

**शिलालेख संकल्पना**

शिळेवर कोरलेला शब्दरुपी आलेख म्हणजे शिलालेख होय, अशी आपण शिलालेखाची प्राथमिक स्वरुपात व्याख्या करु शकतो. लिखित मजकूर दीर्घकाळ टिकून रहावा म्हणून तो दगडी शिळेवर कोरण्याची प्रथा प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. अशा लिखाणाला शिलालेख असे म्हटले जाते. यालाच इंग्रजीमधे 'Epigraphy' तर हिंदीमध्ये 'अभिलेख' असे म्हटले जाते. प्राचीन कालखंडातील राजकीय, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक माहिती मिळविण्याच्या दृष्टिने हे शिलालेख आपली महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

शिलालेखांच्या अक्षरांच्या वळणांवरुन त्यांचा काळ ठरविता येवू शकतो. भारतामध्ये प्रामुख्याने ब्राह्मी लिपी, संस्कृत, प्राकृत, मराठी, देवनागरी, मोडी इत्यादी चिह्न अथवा चित्र लिपींमध्ये शिलालेख कोरलेले दिसून येतात.

## रायगड जिल्ह्यातील विविध शिलालेखांचे स्वरुप

विषय रायगडमधील शिलालेखांचा असो की महाराष्ट्रातील शिलालेखांचा असो तो अलिबाग तालुक्यातील अक्षीच्या शिलालेखांशिवाय पुढे जाऊच शकत नाही. कारण अक्षीचा शिलालेख हा मराठीतील 'आद्य शिलालेख' मानला जातो.

### ०१ अक्षी येथील गध्देगाळ शिलालेख

पूर्वी प्राचीन मराठीच्या इतिहासात कर्नाटक राज्यातील श्रवणबेळगोळ येथील शिलालेख आद्य शिलालेख मानला जात असे. त्याचा कालखंड शके १०३८ – ३९ म्हणजेच इ.स. १११६-१११७ असा होता. परंतु कालांतराने असे लक्षात आले की, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील अक्षी येथील शिलालेखावर 'संकु संवतु: ९३४' म्हणजे इ.स. १०१२ सालचा उल्लेख आल्याने शं.गो. तुळपुळे यांनी आक्षीचा शिलालेख हा मराठीतील आद्य शिलालेख मानला. तुळपुळे यांनी आपल्या 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या ग्रंथामध्ये याचा उल्लेख केला आहे.

अक्षी हे अलिबाग – चौल मार्गावर वसलेले लहानसे गाव असले तरी आपल्या निसर्गसौंदर्यतेमुळे आणि आद्य शिलालेखामुळे पर्यायाने इतिहास अभ्यासकांचे हे गाव म्हणजे एक केंद्रबिंदू बनले आहे. गावातील ग्रामदैवत सोमेश्वर महादेव आणि कालिकादेवी म्हणजेच श्री काळंबादेवी येथे दुर्लक्षित असणारे दोन गध्देगाळ प्राचीन इतिहासाची साक्ष देतात. एका गध्देगाळीवर शिलाहार वंशातील राजाचा तर दुसरीवर यादववंशातील राजाचा उल्लेख आढळतो. सोमश्वर शिवालयाजवळ असणा-या गध्देगाळीविषयी कुलाबा गॅझेटमध्ये असे म्हटले आहे की – "About ten feet to the left of the Someshwar temple is an inscribed stone. Above are the sun and moon followed by fifteen lines in the Devnagari character and below the writing is the ass curse" अशी माहिती दिलेली आढळते.



या गध्देगाळीवरील हा लेख ओबडधोबड शिळेवर कोरलला आहे. कदाचित तेव्हा ही शिळा सुस्थितील असू शकते. सततच्या उन, वारा व पावसामुळे ती आत्ता ओबडधोबड बनलेली असावी. या शिळेच्या माथ्यावर चंद्रसूर्य, नंतर लेख व सरतेशेवटी गाढव आणि स्त्री यांचे शिल्पचित्र अशी याची सर्वसाधारणपण रचना आहे. त्यानंतर पंधरा ओळींचा लेख असून शेवटची

ओळ अर्धवट अवस्थेत आहे. प्रत्येक ओळीमध्ये बारा ते पंधरा अक्षरे आहेत. गध्देगाळ अनेक दशके उघडयावर असल्याने केवळ आठ ते दहा ओळीच अर्धवटपणे वाचता येतात. या लेखाची सुरुवात संस्कृतमध्ये तर दानविषयक तपशिल आणि शापवाणी मराठीमध्ये आहे. या पंधरा ओळींचा तर्कार्थ असा काढता येतो की, चैत्र शुध्द ८, शुक्रवार या दिवशी श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्ती श्री रामचंद्रदेव याची राजवट असताना त्याचा पादपद्मोजिवि श्रीजावईदेव यांचा पुत्र श्री. ईश्वरदेव क्षत्रिय याने अक्षी येथील कालिकादेवी ब्राह्मणास..?? यापुढील काही ओळी अस्पष्ट असल्याने त्या वाचता येत नाहीत. परंतु पूर्वे आणि पस्मै या शब्दांवरुन जमीन दान दिल्याचा आणि त्या जमिनीच्या सीमांचा उल्लेख असावा हे दिसून येते आणि हे दान जो कोणी नष्ट करेल त्याची असस्था स्त्रीला घोडा किंवा गाढव लागल्यासारखी हिन होईल.

'शुभं भवतुं' या शब्दांनी लेखाचा शेवट होतो. सोमेश्वर मंदिराकडून कालिका मंदिराकडे जातना डावीकडील बाजूस अक्षी येथील दुसरी गध्देगाळ दृष्टीस पडते. यावर कोरलेला लेख हा द्वितीय केशिदेव यांनी शके ११३१ या काळातील आहे. वर चंद्रसूर्य, त्याखाली गाढव आणि स्त्री यांची शापवाणी त्यानंतर लेख व पुन्हा खाली चंद्रसूर्य अशी या शिल्पलेखाची रचना आहे. या शिलालेखात एकूण नऊ ओळी असून प्रत्येक ओळीमध्ये अकरा ते चौदा अक्षरे आहेत. हि गध्देगाळ अंदाजे नऊशे वर्ष पुरातन असून गेली अनेक शतके उघड्यावर असल्याने वाचणे दुरापास्त बनते.

शं.गो.तुळपुळे यांनी आपल्या ग्रंथामध्ये याचा असा अर्थ लावला आहे की, " स्वस्ति ओम, पश्चिमसमुद्राधिपति, कोंकणचक्रवर्ति, श्रीकेशिदेवराय याचा महाप्रधान भइर्जु सेणुई म्हणजे सेनापती असताना त्याकाळी, शके संवत ९३४, परिधाती संवत्सर, अधिक मास, द्वितीय पक्ष शुक्रवार या दिवशी भईर्जुवाने बोडणीसाठी नऊ कवली नेमून दिले. त्या दानास अध्यक्ष प्रधान, महालक्ष्मीची आण, लुनचा कचली म्हणजे हा शिलालेख कोरणारा जगात सुखी असो" असा तर्कार्थ लावला आहे. इतिहास म्हटले की, वादंग आलेच! शं.गो.तुळपुळे यांना शब्दाला प्रतिशब्द देत तसेच वादाला प्रतिवाद करीत इतिहासकार वि.वा. मिराशी यांनी तुळपुळे यांनी दिलेला शके ९३४ हा काळ कसा चुकीचा आहे, हे शिलाहार राजवंशावरील आधारीत ग्रंथांवरुन दाखवून दिले.

### ०२ नागाव येथील शिलालेख

नागाव हे अलिबागपासून साधारणपणे सात ते आठ किमी अंतरावर वसले आहे. तेथील कलाकुसर केलेली शिवमंदीरे आणि शिलालेख पाहण्यास अनेक पर्यटक व अभ्यासक येत असतात. याच ठिकाणी भीमेश्वराचे एक पुरातन मंदीर आहे. अनेक लोक त्याचा उल्लेख 'भीमनाथाचे मंदीर' असाही करतात. मंदीराभोवती अतिशय मनोहारी पुष्करणी आहे. या मंदीराशेजारी सापडलेला शिलालेख किंवा मंदीराची एकंदरीत बांधकामाची पध्दत पाहता हे मंदीर शिलाहारकालीन असावे असे वाटते.

मात्र याला तसा कोणताही शास्त्रीय आधार नाही. पेशव्यांनी या मंदीराचा जीर्णोध्दार केला. तेथून जवळणच असणारे वंखनाथाचे मंदीर हे स्थापत्यशैलीमध्ये असल्याने भीमनाथाचे मंदीरही त्याकाळातील असावे असा अंदाज बांधता येतो.



मंदीरात प्रवेश करण्यासाठी तीन प्रवेशद्वारे आहेत. त्यापैकी उजव्या हाताच्या प्रवेशद्वाराच्या बाजूस एक शिलालेख दिसतो. हा शिलालेख दोन ते अडीच फूट लांब आणि दीड फूट रुंद अशा आकाराचा आहे. हा शिलालेख पूर्वी गावामध्ये होता. मात्र ज्यावेळी मंदीराचा जीर्णोध्दार झाला त्यावेळी तो शिलालेख मंदीराच्या पायरीवर बसविण्यात आला, असे सांगितले जाते. कुलाबा गॅझेटमध्ये हा शिलालेख संस्कृतमध्ये लिहिला आहे असे सांगण्यात आले असले तरी तो देवनागरी लिपीमध्ये लिहीला असल्याचे आढळते.

शिलालेख चांगल्या पध्दतीने कोरला असल्याने सर्व अठ्ठावीस ओळी स्पष्ट वाचता येतात. प्रस्तुत लेख हा शके १२८९ म्हणजेच इ.स. १३६७ मधील आहे. त्याकाळी ठाणे प्रांतात "श्रीमत्यप्रौढीप्रताप चक्रवर्ती हंबीरराव महाराज" राज्य करीत होते. या कोरीव मजकूरात अनेकदा सिहीप्रो या नावाचा उल्लेख येतो.

खरे तर सिहीप्रो हा हंबीररावांचा मुख्य प्रधान होय. मुळ लेखात असा उल्लेख आला आहे की, सिहीप्रो याने अष्टागर प्रांतामधील नागाव आगारातील चिंचावळी या गावात एक मशीद उभी करुन तेथील रत्नदीप लावण्यासाठी काही दान दिले आहे. इतर लेखांमध्ये त्याने आगरी लोकांना सुध्दा दान दिल्याचा उल्लेख आढळून येतो. हंबीरराव हे देवगिरीच्या साम्राज्याशी संबधित जरी असले तरी नागाव येथील शिलालेखावर बहामनी राजवटीचा प्रभाव दिसून येतो.


**०३ जगदीश्वर मंदीरावरील शिलालेख**

किल्ले रायगडावरील बाजारपेठेच्या खालील बाजूस पूर्वेकडील उतारावर एक ब्राह्मणवस्ती दिसून येते. त्याठिकाणी जगदीश्वराचे भव्य शिवालय दृष्टीस पडते. या शिवालयात प्रवेश करताच भव्य सभामंडप दिसतो. मंडपाच्या मध्यावर प्रशस्त कासव आहे. या मंदीराच्या प्रवेशद्वाराच्या पायरीवर एक लहानसा शिलालेख कोरलेला आहे. "सेवेचें ठायी तत्पर । हिरोजी इटळकर" असे शब्द यावर कोरलेले आहेत.



त्याचप्रमाणे या दरवाजाच्या उजव्या बाजूवरील भिंतीवर एक सुंदर शिलालेख कोरलेला दिसतो. या तर्कार्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल. " सर्व जगाला आनंददायी असा हा जगदीश्वराचा प्रासाद श्रीमद छत्रपती शिवाजी राजा यांच्या आज्ञेने शके १५९६ मध्ये आनंदनाम संवत्सर चालू असताना सुमुहुर्तावर निर्माण केला. या रायगडावर हिरोजी नावाच्या शिल्पकाराने विहिरी, तळी, बागा, रस्ते, स्तंभ, गजशाळा यांची उभारणी केली. ती चंद्रसूर्य असेपर्यंत खुशाल नांदो." अशा अर्थाचा मजकूर पहावयास मिळतो.

### ०४ कुडा लेण्यांतील शिलालेख



मुरुड जंजि-यापासून जवळच असणा-या कुडा येथील लेण्या या प्राचीन इतिहासाच्या अभ्यासकांना आकर्षित करतात. या लेण्यांची पहिली नोंद १८४८ सालची सापडते. या लेण्या मांदाडपासून जवळच आहेत. याठिकाणी अलिकडील काळात झालेल्या उत्खननात सुमारे दोन हजार वर्षापूर्वीची खापरे आणि विटा सापडल्या. येथे एकूण २६ कोरीव गुंफांचा समावेश आहे. येथील विविध भिंतींवर कोरलेले शिलालेख विविध दान देणा-यांची माहिती देतात.

आतील बाजूस कोरलेल्या एका शिलालेखात सुलसदत्त आणि उत्तरदत्त यांचा मुलगा शिवभूती याने हे दान दिल्याची नोंद सापडते. शिवभूतीने स्वतःच हा लेख कोरल्याने या शिलालेखावरील अक्षर अत्यंत सुस्पष्ट आणि वळणदार आहे.

### ०५ सुरगड येथील शिलालेख

रोहा तालुक्यातील वैजनाथ येथील खांब गावाजवळ 'सुरगड' हा किल्ला आहे. हा किल्ला दक्षिण कोंकणातील शिलाहार राजांच्या काळात बांधला असावा. शिवरायांनी जे नव्याने गड बांधले त्यामध्ये या सुरगडाचाही समावेश आहे. राजाराम महाराजांच्या काळात सुरगड हा शंकरजी नारायण सचिवयांनी सिद्दीकडून जिंकून घेतला. पुढे इ.स. १७३३ मध्ये थोरले बाजीराव पेशवे यांनी सुरगड पुन्हा ताब्यात घेतला. या गडावर एक शिलालेख कोरला आहे. या शिलालेखात असे दिसून येते की गडाचा हवालदार व गडबांधणा-याचे नाव सूर्याजी व किल्याचे सुभेदार तुकोजी हैबत असे असून इ.स. १८१८ मध्ये फेब्रुवारी महिन्यात कर्नल प्रॉथर याने हा किल्ला ताब्यात घेतला.

### ०६ अवचित गडावरील शिलालेख



रोह्यापासून पाच किमी अंतरावर 'पिंगळसई' हे गाव आहे. येथे असणा-या गडाची बांधणी शिलाहार राजांनी केली. इ.स. १६५८ मध्ये महाराजांनी हा किल्ला स्वराज्यात सामील केला. आदिलशाहकडून जिंकून अगदी घाई गडबडीत महाराजांनी या किल्ल्याची बांधणी केली. हे सर्व अवचित घडले म्हणून हा अवचितगड होय.

गोमुखी प्रवेशद्वार, घोड्याला पंख असणारे शिल्प, बारा कोनी तलाव आणि एकंदरीतच वास्तुशास्त्र गतकालीन वैभवाची साक्ष देणारे आहे. या गडाचा मुख्य दरवाजा भग्नावस्थेमध्ये असून त्याच्या पायथ्याशी एक शिलालेख कोरला आहे. "श्री गणेशाय नमः श्री जयदेव शके १७१८, नलनामसंवत्सरे, चैत्र शुध्द प्रतिपदा" अशा ठळक अक्षरांमध्ये हा शिलालेख कोरला आहे.

शिवाय रायगड जिल्ह्यामध्ये तळेगाव, चरईखुर्द उंबार्डी येथेही दुर्लक्षित शिलालेख आहेत. तळा, सुकेळी खिंड येथेही प्राचीन पाण्याच्या टाक्यांवर कोरीव बांधकाम केलेले आढळते. माणगाव येथील खानजाई मंदीर, दासगाव येथील पुरातन मंदीर, महाड येथील गांधारपाले लेण्या

तसेच रेवदंडा ते चौल परिसरातही अनेक लहान मोठे मजकूर लिहिलेले प्राचीन शिलालेख प्राचीन मराठी इतिहासाच्या वैभवाची साक्ष देतात.

**समारोप**

रायगड जिल्ह्यातील शिलालेखांवरील लिपीचिह्नांवरुन तत्कालीन मराठीची स्थिती आणि भाषिक व्यवस्था, स्वनिक रचना, कालांतराने होत गेलेले अर्थपरिवर्तन या भाषावैज्ञानिक अभ्यासाला पुष्टी मिळते. रायगड जिल्ह्यातील प्राचीन शिलालेखच नव्हेत तर प्राचीन मंदीरे, मशिदी, लेण्या, चर्च, स्तूप, युध्दसामग्री हे सर्व पुरावे अज्ञानाअभावी नामशेष होत चालले आहेत. या सर्व पुरातन अवशेषांचे संवर्धन व्हावे म्हणून शासनाने ठोस पाऊले उचलावयास हवीत. यासाठी जिल्हास्तरीय वस्तूसंग्रहालय बांधणे अत्यंत गरजेचे आहे. प्राचीन मराठी शिलालेखांच्या इतिहासात रायगड जिल्ह्यातील शिलालेखांचे योगदान अनन्यसाधारण आहे. महाराष्ट्रातील आद्य शिलालेख म्हणून अक्षी येथील शिलालेखाकडे पाहिले जाते, ही आपल्या रायगडकरांसाठी अभिमानाची बाब आहे. पण अक्षीसारख्या ठिकाणी या खितपत पडलेल्या शिलालेखाची शोकांतिका पाहून सर्व पर्यटक हळहळ व्यक्त करतात. आपण एका आद्य शिलालेखाजवळ उभे आहोत, याची साक्ष म्हणून त्या शिलालेखासोबत 'सेल्फी' काढतात. या शिलालेखाबद्दल एवढेच म्हणावेसे वाटते

धन, धान्य, संपन्नता होती तव त्या काळा
गौरवाने आणि अभिमानाने कोरली माझी शिळा
काळ सरला, वर्ष सरले कौतुक सारे संपून गेले
खितपत पडलो एकाच जागी, अवचित एकाकीपण आले
गध्देगाळीच्या चित्रशिल्पाने शापवाणी लागली
अशुभ म्हणून हिणवती मज नसतीच बाधा आली
उन्हाचे चटके सोसत त्वचा सारी करपून गेली
वारा पाऊस अंगी झेलत ओळख सारी पुसून गेली
आज पुन्हा मला कोणी जिवंत करु पहात आहे
मी 'आद्य' म्हणून माझे गोडवे कोणी गात आहे
पण मला मान नको, सन्मान नको, फक्त एवढे करा
जीर्ण थकलेल्या माझ्या शिळेचे, तुम्हीच संवर्धन करा.

**संदर्भ**


०१ तुळपुळे शं.गो. , प्राचीन मराठी कोरीव लेख, १९६३, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे
०२ सखाराम शंकर, एक हजार वर्षांचा झाला मराठीतील आद्य शिलालेख, ललित मॅजेस्टीक प्रकाशन.
०३ Gazetteer of the Bombay Presidency, Vol. XI (Kolaba and Janjira), Page 253
०४ मिराशी वि.वि., शिलालेख क्र. ३५, Inscriptions of Shilaharas, 1977
०५ परांजपे शंतनू, नागावेच भीमेश्वर, संकेतस्थळ

# ७. मराठी भाषेतील काही दुर्मिळ शिलालेख

प्रा.नम्रता नितिन पाटील
मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग

' ज्ञानदेव बाळ माझा सांगे गीता भगवंता
लक्ष द्या हो विनविते मराठी मी त्याची माता '।

**प्रस्तावना**

आज २७ फेब्रुवारी कवी कुलगुरू कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी राजभाषा गौरवदिन. या मराठी गौरव दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेचा उगम इतिहासातील पुरावे म्हणजेच कोरीव ताम्रपट आणि शिलालेख यांचे जतन संवर्धन करून खऱ्या अर्थाने प्राचीन मराठी साहित्याला मानवंदना म्हणून मराठी अस्मिता जागृत ठेवण्याचा हा अल्पसा प्रयत्न. इतिहासाचे लेखन आणि अभ्यास हा भूतकाळ संबंधी माहिती देऊ शकणाऱ्या विविध साधनांवर अवलंबून असतो प्रस्तुत साधनांची माहिती घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

**शिलालेखाचे स्वरूप**

शिलालेख म्हणजे दगडावर अथवा शिळेवर कोरून ठेवलेला मजकूर पुरातत्त्व शास्त्रात याला पुराभिलेख असे म्हटले जाते. धार्मिक सामाजिक राजकीय आणि ऐतिहासिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने कोरीव लेख महत्वपूर्ण ठरतात. ऐतिहासिक प्राचीन बौद्ध लेण्यांमध्ये जास्तीत जास्त शिलालेख सापडलेले दिसतात विदर्भाच्या चंद्रपूर जिल्ह्यातील देवटेक येथे सापडलेले मौर्य अशोकाचे शिलालेख हे महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन शिलालेख होय.

याबरोबरच दुर्मिळ असे शिलालेख अभ्यासून इथे मांडण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे

**धर्मापुरी शिलालेख**



बीड जिल्ह्यातील धर्मापुरी येथील शिलालेख या शिलालेखाच्या शिळेची उंची 115 सेंटिमीटर असून रुंदी 65 cm आहे. शेळ्याची वरची बाजू अर्ध गोलाकार असून या अर्धगोलाकारात उजवीकडे चंद्र मध्यभागी एक उभी मूर्ती आणि डावीकडे सूर्य यांच्या आकृती आहेत या अर्धगोलाचा उजवीकडील काही भाग तुटला असल्याने आरंभीची काही अक्षरे नष्ट झाली आहेत शेळीच्या

खालच्या डाव्या बाजूवर गद्धेगाळीचे शिल्प कोरलेले दिसते. सदर लेखात कोरीव लेखाच्या एकूण 45 ओळी असून प्रत्येक ओळीत सुमारे 40 ते 45 अक्षरे आहेत परंतु शिरा अनेक ठिकाणी खराब झाल्यामुळे बरीच अक्षरे दुर्वाच्य झालेली आहेत ऊन वारा पाऊस यामुळेही अनेक अक्षरे अस्पष्ट झालेली आहेत.' शके सवंत १०५६ आनंदसंवत्सरान्तर्गत आषाढ वदि १५ सोमे, असा दिला आहे. या शिलालेखाच्या काल लेखाच्या पहिल्याच ओळीत शिलालेखातील लेख संस्कृत भाषेत लिहिलेला असून काही मजकूर पद्यत व काही मजकूर गद्यात आहे.

## गणेशवाडी शिलालेख

उस्मानाबाद जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात केशव भारती समाधी जवळच्या शिलालेखाला गणेशवाडी शिलालेख असे म्हणतात या कोरीव लेखाच्या दोन शिळा आहेत पहिल्या वेळेवर प्रारंभी चंद्र सूर्य मंगल कलश आणि नागरी लिपीत संस्कृत भाषेत 52 ओळींचा मजकूर कोरलेला आहे दुसऱ्या शाळेवर प्रारंभी नंदी शिवलिंग व त्यासमोर उभा असलेला एक विनम्र भक्त यांच्या आकृती कोरलेल्या असून नागरी लिपीतील संस्कृत भाषेत 50 ओळींचा मजकूर कोरलेला आहे याच शाळेच्या डाव्या बाजूवर 52 ओळींचा मजकूर नागरी लिपीत व संस्कृत भाषेत कोरलेला आहे. या दोन्ही शिळांवरील मजकुराचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की कल्याण येथील चालुक्य नुपती विक्रमादित्य सहावा याचा सेनापती भीम याची प्रशस्ती यावर प्रामुख्याने कोरलेली दिसते.

## हरिश्चंद्र गडावरील शिलालेख

अहमदनगर जिल्ह्यात अकोला तालुक्याच्या पश्चिमेकडील सीमेवर हरिचंद्र नावाचा एक पर्वत आहे हा पर्वत हरिचंद्र गड या नावाने ओळखला जातो. समुद्रसपाटीपासून सुमारे साडेचार हजार फूट तो उंच असो त्याची एक बाजू उंच उंच अशा तुटलेल्या ताशीव कड्यासारखी आहे. गडाच्या घाटमाथ्यावर एक लहानसा किल्ला असून घाटमाथापासून सुमारे ६०० फूट खाली काही लेणी आहेत ही लेणी ओबडधोबड असून काही लेण्यांमध्ये प्रवेशद्वारावर गणपतीची मूर्ती कोरलेली आहे काही देवळात देवतांच्या मूर्ती अजूनही आहेत देवळाच्या आग्नेय भागात दगडात कोरलेली देवतेची विशाल अशी मूर्ती आहे तर जवळच काही गुहा आहेत तेथून सुमारे दीडशे फूट अंतरावर ५५ चौरस फूट आकाराचे एक लेणे आहे. या लेण्यात काही शिलालेख असल्याचे दिसून येते.

## पारडा शिलालेख



बुलढाणा जिल्ह्यातील लोणार क्षेत्राच्या दक्षिणेस सुमारे सहा महिलांवर असलेल्या पारडा गावाच्या शिवमंदिराच्या खांबाच्या तुटून पडलेल्या एका शिळेवर हा शिलालेख सापडलेला आहे. मुख्य दरवाजाच्या उंबरठ्यावर एक लेख कोरलेला असून तो बराच अर्वाचीन

असावा सदर लेख दोन फूट लांब व सहा इंच रुंद असून त्यावर तीन ओळी आहेत हा लेख मराठीत असून दुसऱ्या ओळीच्या आरंभी बांधिले हा शब्द आहे. याच शिवमंदिराच्या बाहेरच्या खांबावर चौकोनी लेख आहे परंतु तो दुर्वाचे आहे शेवटच्या ओळीत १२४५ हा आकडा अस्पष्ट दिसतो मंदिराच्या आतील खांबावर असलेला मराठी शिलालेख मात्र स्पष्ट आहे.

या शिलालेखाची लांबी एक फूट असून रुंदी साधारणपणे सहा इंच आहे पहिल्या तीन ओळीत प्रत्येकी सुमारे 12 अक्षरे असो चौथ्या ओळीत फक्त दोनच अक्षरे आहेत अक्षरे ठसठशीत कोरली असून अक्षरांचे वळण हे यादवकालीन दिसते. अक्षरांच्या एकूण वळणावरून तो १४ व्या शतकातील असावा असे वाटते. एकंदरीत प्राचीन मराठी शिलालेखांच्या इतिहासात सदर शिलालेखांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.

संदर्भ १ कोलते वि.भि.,' महाराष्ट्रातील काही ताम्रपट, शिलालेख,'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई,

२. तुळपुळे श. गो.,' प्राचीन मराठी कोरीव लेख,' पुणे विद्यापीठ प्रकाशन पुणे

# ८. निसर्गाच्या सानिध्यातील गांधारपाले


प्रा. रूपाली दिलीप पाटील
मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग



गांधारपाले लेणी म्हणजे डोंगरात कोरलेल्या अठ्ठावीस अशा बौद्ध लेण्यांचा समूह आहे. सर्व लेण्यांची रचना ही जवळपास सारखीच असलेल्या या लेण्या आहेत. या लेण्या म्हणजे रायगड जिल्ह्यातील महाड शहराला लाभलेला सातव्या शतकापासूनचा वैभवसंपन्न असा इतिहास आहे. महाड तालुक्यातील गांधारी नदीच्या तीरावर सातव्या शतकातील गांधारपाले ही बौद्धकालीन लेणी आहे. मुंबई-गोवा महामार्गाने महाड शहरात प्रवेश करताना ३ की.मी आधी डाव्या बाजूस डोंगरात कोरलेली गांधारपाले लेणी आपल्या नजरेत येते. दक्षिणोत्तर पसरलेल्या डोंगराळ टेकडीवर पायथ्यापासून साधारण २०० फूट उंचीवर ही पूर्वाभिमुख लेणी आहे. पायथ्याजवळ पुरातन काळातील फलक असून येथून अर्ध्या तासात पायऱ्या चढून आपण लेण्यांपर्यंत पोहोचतो. पायऱ्या चढल्यावर सर्वप्रथम आपल्याला अठ्ठावीस क्रमांकाची लेणी दिसते. पुरातन काळातील लोकांनी या लेण्यांना एक ते अठ्ठावीस असे क्रमांक दिले असून पहिल्या क्रमांकाच्या लेण्यापासून सुरुवात केल्यास सर्व लेण्या आपल्याला व्यवस्थितपणे पाहता येतात. तीन स्तरावर कोरलेल्या या लेणी समूहात अठ्ठावीस लेणी असून त्यात तीन चैत्यगृह, एकोणीस विहार व अनेक पाण्याचे कुंडल आहेत. अभ्यासकांच्या मते ही लेणी कंभोग वंशातील विष्णू पुलित या राजाने खोदलेली असून पाले हा पुलित नावाचा अपभ्रंश आहे. लेण्यांसमोरून महाड शहर,चांभारगड सावित्री नदी, मुंबई-गोवा महामार्ग असा सुंदर देखावा पहावयास मिळतो.

आपण जर पहिली लेणी पाहिली तर त्यामध्ये चैत्यगृह आणि विहार अशा पद्धतीच्या या लेणीत सात कमानी आहेत. लेण्यांच्या दर्शनी भागात असलेल्या सहा स्तंभांपैकी एक स्तंभ पूर्णपणे कोरलेला असून उर्वरित पाच अर्धवट आहेत. तसेच, भिंतीवर चार विहार आहेत भगवान बुद्धांची सिंहासनावर बसलेली मूर्ती कोरलेली आहे. या लेणीच्या पुढील भागात पाण्याची तीन कुंडले आहेत. दुसरी लेणी ही अर्धवट कोरलेली लेणी असून त्याच्या दर्शनी दोन खांब व विहार अशी रचना आहे. तिसऱ्या लेणीमध्ये दर्शनी भागात दोन स्तंभ व त्यामागे

दगडी ओटे आहेत. चौथ्या लेणीत वरांड्याच्या उजव्या बाजूस भिंतीवर ब्राह्मी शिलालेख कोरलेला आहे. पाचव्या लेणीची रचना मंडपासारखी आहे.सहावी लेणी ही खालच्या स्तरात अर्धवट कोरलेली लेणी असून या लेणीजवळ दोन पाण्याची कुंडले आहेत. सातवी लेणी पाहिली तर दर्शनी भाग कोसळलेला असून वरांडा व विहार अशी रचना आहे.आठवी लेणी यात दोन तुटलेले स्तंभ आणि दोन चौकोनी आकाराचे नक्षी कोरलेले अर्धस्तंभ आहेत. लेणीच्या उजव्या बाजूस भिंतीवर प्राकृत भाषा आणि ब्राह्मी लिपीतील शिलालेख कोरलेला आहे. नववी लेणी यात खांबाच्या तळाशी चौकोनी आणि वरती अष्टकोनी असून त्यावर नक्षी कोरली आहे.दहावी लेणी म्हणजे कोनाड्यात कोरलेला समूह आहे.



अशा प्रकारे आपण अठ्ठावीस लेण्यांपैकी दहा लेण्यांची वर्णन केले आहे. उर्वरित लेण्या पाहिल्या तर काही दर्शनी भाग कोसळलेला असून वरांडा व विहार अशी या लेण्यांची रचना आहे व अष्टकोनी व चौकोनी आकाराचे स्तंभ यावर नक्षीकाम केलेले दिसून येते. काही लेण्यांमध्ये लेखांची लिपी ब्राह्मणी आणि भाषा प्राकृत अशा पद्धतीने रचना केलेली दिसते.

# ९. शिलालेख

**प्रा. वृषाली प्रवीण घरत**
इंग्रजी विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग

पुरातत्त्विक स्तोत्र च्या अंतर्गत अभिलेख एक महत्त्वपूर्ण स्तोत्र आहे, त्याचे प्रमुख कारण त्यांचे तिथीयुक्त तसेच समसामाईक असणे. ज्या अभिलेखांच्या माध्यमात शासककाची उपलब्धता ,तसेच यशोगाण आहे त्याला प्रशस्ती करण्यासाठी त्यांचे अभिलेखनाद्वारे अध्ययन केले जाते त्यास एपीग्राफी म्हटलं जातं. अभिलेखांमध्ये शिलालेख ,स्तंभलेख गुहालेख ,मूर्ती लेख इत्यादी प्रकार येतात.

भारतात सर्वात प्राचीन अभिलेख अशोक मौर्य चे आहे. शक शासक रुद्र दामन हा जुनागड अभिलेख भारता मध्ये संस्कृतचा पहिला अभिलेख आहे. राजस्थानमध्ये अभिलेखांची मुख्य भाषा संस्कृत, एवं राजस्थानी आहे त्यांची शैली गद्यपद्य ,तथा लेखणी महाजनी एवं हर्षकालीन आहे, परंतु नागरी लिपी ही विशेष रूप मध्ये कामकाजात आणली गेली आहे. राजस्थानमध्ये प्राप्त झालेल्या 162 शिलालेख ची संख्या आणि त्यांचे वर्णन वार्षिक रिपोर्ट, राजपुताना अजमेर मध्ये प्रकाशित झालेले आहे. राजस्थानमध्ये पुरातात्त्वीक सर्वेक्षणचं कार्य सर्वप्रथम 1871 इ . कारवाईस प्रारंभ केला-

**१. बडली चा शिलालेख**

अजमेर जिल्ह्यात बडली गावात 443 इसवी पूर्व काळात शिलालेख ,वीर समवत चौऱ्याऐंशी आणि विक्रम समवत ,368 म्हणजेच सम्राट अशोक च्या आधी ब्राह्मी लिपीत लिहिलेला आहे. स्थानीय अख्यानुसार पद्मसे बलींचा समृद्ध राजा राज्य करत होता, ज्याने अजमेर च्या तलाठी गावामध्ये वियावती इंदोरकोट नगरी बसवली होती. अजमेर जिल्ह्यामध्ये 27 किलोमीटर दूर बडली गावा मध्ये भिलोत माताच्या मंदिरात काही स्तंभाचे तुकडे प्राप्त झाले आहेत. राजस्थान तसेच ब्राह्मी लिपीचा सगळ्यात प्राचीन शिलालेख हाच आहे. हा अभिलेख गौरीशंकर हिराचंद ओझा यांना भिलोत माताच्या मंदिरामध्ये प्राप्त झालेला आहे. राजस्थानचा हा सर्वात प्राचीन अभिलेख आहे जो वर्तमान काळात अजमेर ग्रंथालयात सुरक्षित आहे ,तसेच मध्य चितोड मध्ये जैन धर्माचा प्रसार उल्लेखनीय आहे.

**२. घोसुंडी शिलालेख, द्वितीय शताब्दी ईसा पूर्व.**

हा लेख कितीतरी शीला खंडापासून तुटलेला आहे, त्याचे काही तुकडे उपलब्ध आहेत त्यातील काही भाग बडाखंड उदयपूर संग्रहालय मध्ये सुरक्षित ठेवण्यात आला आहे. घोसुंडी हा शिलालेख नगरी चितोड च्या जवळ घुसूंडी मध्ये प्राप्त झाला. या लेखातील भाषा संस्कृत आणि ब्राह्मी लिपी आहे. घुसूंडीचा शिलालेख सर्वप्रथम डॉक्टर डी आर भंडारकर यांनी वाचला आणि राजस्थान मधील वैष्णव या भागवत संप्रदाय मध्ये संबंधित सर्वाधिक प्राचीन अभिलेख असा त्याचा उल्लेख ज्ञात केला . त्याकाळी राजस्थानमध्ये भागवत धर्म लोकप्रिय होता

म्हणून भागवत ची पूजा निमित्त म्हणून शीला प्रकार बनवले गेले ज्यात त्याचे वर्णन आहे. या लेखात संघर्ष वर्णिला आहे. वासुदेव यांचे पूजागृह चतुदिशा चट्टाण आणि चार दिवारी बनवीले ,गजवंश हे सर्वताद्वारा अश्वमेघयज्ञ असा उल्लेख आहे. या लेखाद्वारे महत्त्वाचे द्वितीय शताब्दी ईसा पूर्व चे भागवत धर्म प्रसार संकर्षण तसेच वासुदेव ची मान्यता आणि अश्वमेय यज्ञ याचे प्रचलन इत्यादी वर्णिले आहेत.

**३. बिजोलिया शिलालेख**

बिजोलिया च्या पार्श्वनाथ जैन मंदिरा जवळ एक चट्टानजवळ उत्कीर्ण 1170 इ के इस शिलालेख जैन श्रावक लोलाक द्वारा मंदिर निर्माण केले गेले. हे मंदिर त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ बनवले गेले, असा प्रशस्तीकार गुणभद्र होता. या अभिलेखात सांभर एवम अजमेर चे चौहानो चे वर्णन नुसार चौहान आधी पुरुष ,वासुदेव चौहान जे 551 इसवी मध्ये शाकंभरी , चौहान राज्य ज्याची स्थापना झाली होती. तथा सांबर झील ची निर्मिती करून अहिछत्रपूरला आपली राजधानी बनवली ,ज्यामध्ये सांबर तथा अजमेरचे चौहानाना वस्त्र गोत्रिय ब्राह्मण असे संबोधले गेले आहे. या लेखाद्वारे त्या काळातील क्षेत्रानुसार प्राचीन नाव पहावयास भेटतात जसे की जबाल्लीपूर (जालौर), नड्डूल (नाडोल), शाकंभरी (सांभर ),दिल्लीका (दिल्ली), श्रीमाल (भिनमाल), मंडलकर (मांडलगड), विंध्यवल्ली (बिजोलिया ),नागरुदय (नागदा), इत्यादी. या लेखाद्वारे त्या काळातील भूमी अनुदानाचे वर्णन डोहली नावाने केलं आहे.

बिजोलिया च्या आसपास पठारी भागाला उतमाद्द्री हे नाव संबोधिले गेले .ज्याचे वर्तमान काळात उपरमाल असे नाव पडले आहे. प्रस्तुत अभिलेख संस्कृत भाषेमध्ये आहे तसेच या अभिलेखात तेरा पद्य लेख म्हणजेच दिगंबर लेख आहेत . गोपीनाथ शर्मा नुसार १२ व्या शतकात जनजीवन धार्मिक अवस्था, भौगोलिक आणि राजनीति अवस्था जाणून घेण्याच्या हेतूने हा लेख अतिशय महत्त्वाचा आहे . या शिलालेखाद्वारे कुटीला नदीच्या जवळ अनेक शैव तसेच जैन तीर्थ स्थळांचे मार्गदर्शन होते.

**४. रणकपूर प्रशस्ती ( चौदाशे एकोणचाळीस ई.)**

याचे प्रशस्तीकार देपाक होते . मेवाडचे राजेवंश एवम धर्म सेट यांचे वर्णन मिळालेले आहे, इथे बप्पा एवं कालभोज अशा वेगवेगळ्या व्यक्ती संबोधिल्या आहेत त्यात महाराणा कुंभा हा वीजीओ एवं उपाध्यियाचे वर्णन आहे. ह्या गुहीलोला बप्पा रावळ चा पुत्र संबोधले आहे.

रणकपूरच्या चोमुखा जैन मंदिरात स्थापित रडतपुर मंदिर चा निर्माता सूत्रधार दीपा आहे. बप्पा ते कुंभार पर्यंत वंशावली दिली आहे. ज्यामध्ये बाप्पा गुहिलला पिता म्हणून संबोधीला आहे. येथे वंशावलीमध्ये महेंद्र अपराजिता असे बरेच नाम जोडलेले आहेत तरीपण कुंभाचे वर्णन एक महत्त्वपूर्ण मानले जाते. इथे महाराणा चा सुरुवातीचा विजय बुंदी गागरोण, सारंगपूर, नागोर ,अजमेर ,मंडोर, मांडलगड आधीचे वर्णन आहे. मेवाडचे प्रचलित नानक नामक मुद्रा साक्ष मिळत आहे. स्थानिक भाषेमध्ये आजही नाणा शब्द मुद्रासाठी कामकाजात वापरला जात आहे.

**५. कीर्ती स्तंभ प्रशस्ती 1460.**

याचे प्रशस्ती कार महेश भट होते येथे राणा कुंभार प्रशस्तीमध्ये बाप्पा ला घेऊन राणा कुंभ पर्यंत वंशावली चे वर्णन आहे. येथे कुंभाचे उपलब्धता तसेच त्याद्वारा रचलेले ग्रंथाचे वर्णन मिळते प्रशस्तीमध्ये चंडी शतक गीत गोविंद ची टीका ,संगीत राज इत्यादी ग्रंथांमध्ये उल्लेख केला आहे.

ह्या प्रशस्तीतर्फे कुंभार महाराज धीराज अभिनव भष्टाचार्य हिंदुस्तान सुलतान राय रायन ,राणू रासो, छाप गुरु दान, गुरु राजगुरू आणि सेल गुरू यांना या उपाध्धीयानी पुकारले गेले आहे . कुंभाने मालवा आणि गुजरातच्या सेनेला हरवल्यानंतर ह्या विजयाचे उपलक्ष चितोडच्या विजयस्तंभाची निर्मिती करायला विजय स्तंभ पाचवी मंजिलवर उत्तकीर्ण आहे. (उत्तकीर्णकरता- जेता ,पौमा, पूजा, जयता.). महाराणा कुंभा ची उपलब्धता तसेच युद्धाचे वर्णन 179 चे श्लोक मध्ये आहे. गुजरात मध्ये मालवा सम्मिलीत सेना ला पराभवीत करण्याची साक्ष लिहिलेली आहे.

**६. मानमोरी अभिले (713ई.)**

या लेखात चितोड च्या जवळ मानसरोवर ते कट कर्नल टोड येथे जाऊन मिळतात. चितोडची प्राचीन स्थिती तसेच मोरी वंश चा इतिहासासाठी हा अभिलेख उपयोगी आहे या लेखाद्वारे धार्मिक भावना अनुप्राणिक होऊन मानसरोवर झीलची निर्मिती केली गेली आहे. अमृत मंथन चा पण उल्लेख मिळाला आहे. शिलालेखच्या अत्याधिक भार असल्या कारणाने कर्नल जेम्सने इंग्लंडला जाण्याची अपेक्षा व्यक्त करून त्यास समुद्रामध्ये फेकण्यासाठी उचित समजला गेला. स्थान चितोडगड लेखक पुष्प शोधक करता जेम्स टाड उत्किर्ण करता शिव्यादित्य निर्मीला.

**७. सारणेश्वर प्रशस्ती (953ई.)**

उदयपुरातील वैकुंठी नगर येथील सारणेश्वर नामक शिवालयवर स्थित असलेले ह्या प्रशस्तीवर वराह मंदिराची व्यवस्था आहे . हेस्थानीय व्यापार कर शासकीय पदाधिकारी आदींचे विषय समजतात गोपीनाथ शर्मा च्या मान्यतेनुसार मुळात हा प्रशस्ती उदयपूर येथे आहट ह्या गावी वराह मंदिर च्या जवळ लागलेली आहे नंतर तिथून हलवून वर्तमान सारणेश्वर मंदिरात निर्मिती वेळी सभामंडपामध्ये छवणे च्या कामी आलेली आहे.

**८. कुंभलगड शिलालेख 1460 (राजसमंद)**

हा शिलाले ख कुंभलगड दुर्ग मध्ये स्थित कुंभ शाम च्या मंदिरात सापडला आहे. त्याची पुढील प्रमाणे विशेषता

१) इथे गुहिल वंशाचा वर्णन आहे.

२) हे मेवाडच्या महाराणा च्या वंशावळी रूपामध्ये माहितीसाठी महत्वपूर्ण साधन आहे.

३) राजस्थानचा एक मात्र अभिलेख आहे जो महाराणा कुंभा च्या लेखनाद्वारे प्रकाशित झाला.

४) या लेखामध्ये हमीर ची विषम घाटी पंचांग असे संबोधले आहे.

लेखात मेवाडचा महाराणा ची वंशावळी विशुद्ध रूपात जाणण्याची महत्त्वपूर्ण माहिती आहे. सर्व मिळून पाच शिलाले खाचा वर्णनात्मक २७०९ श्लोक आहेत. दासता ,आश्रम व्यवस्था, यज्ञ .तपस्या ,शिक्षा अनेक विषय चा उल्लेख या शिलालेखा मार्फत मिळतो.
या लेखाचा रचिता डॉक्टर ओझा नुसार महेश असले पाहिजे कारण या लेखात साक्ष्य चित्तोड ची प्रशस्ती मिळाली आहे.

प्रतापगड अभिलेख ( ९४६ई.) अभिलेखात गुर्जर प्रतिहार नरेश महेंद्र पाल उपलब्धतेचा वर्णन केलेला आहे तत्कालीन समाज कृषी समाज एवम धर्म ची जानकारी मिळते. विराट नगर अभिलेख (जयपुर) अशोकाचे अभिलेख मौर्य सम्राट अशोक चे दोन अभिलेख विराटच्या पहाडी मध्ये मिळाले. (भाबरू अभिलेख)

**९. बैराठ शिलालेख**

जयपुर स्तीत विराट नगर बीजक पहाडीवर ह्या शिलालेखाचे उत्कीर्ण आहे. हा शिलालेख पाली आणि ब्राह्मणी लिपीमध्ये लिखित स्वरूपात आहे. या शिलालेखाचा कालांतर 1840ई. ब्रिटिश सेनाधिकारी कॅप्टन बर्ड द्वारा कटवावर कलकत्ता च्या संग्रहालयात ठेवला केला आहे. या अभिलेखात सम्राट अशोक द्वारा बौद्ध धर्म एवम संघाची आस्था प्रकट केली गेली आहे या अभिलेखाद्वारे अशोकाचे बुद्ध धर्म च्या अनुयायी होण्याची सिद्धता आहे या मौर्य सम्राट अशोक द्वारे स्वयम उत्किर्ण केली गेली होती.

**१०. फारशी शिलालेख**

भारतातील मुस्लिम राज्याची स्थापना पश्चात फारसी भाषा लिखित स्वरूप तसेच प्रचुर मात्रांमध्ये उपलब्ध आहे. या लेखात मज्जिद दर्गा कबर सराया तालाब जवळील घाट दगड आधीवर उत्किर्ण केलेले आहे. राजस्थानमध्ये मध्यकालीन इतिहास साची निर्मिती या लेखाद्वारे महत्वपूर्ण मिळण्याची सहायता झाली आहे या माध्यमातून राजपूत शासक आणि दिल्लीचा सुलतान तथा मुघल मध्ये लढले लढले गेलेले युद्ध राजस्थानच्या विभिन्न क्षेत्रा द्वारे वेळोवेळी होणारे मुस्लिमांच्या आक्रमण राजनीतिक संबंध आधीचे मूल्यांकन करू शकतो.
प्रकारच्या लेखात सांभर नागोर मेडता जालोर सांचोर जयपुर अलवर टोंक कोटा अधिक क्षेत्र मध्ये अधिक प्राप्त झाले आहेत.

अजमेरच्या अडीच दिवसांच्या झोपडीच्या घुमटाच्या भिंतीमागे फारसी भाषेत लिहिलेला सर्वात जुना लेख सापडला आहे. हा लेख इसवी सन १२०० चा आहे आणि त्यात संस्कृत शाळा पाडून मशीद ज्यांच्या मार्गदर्शनाखाली बांधली गेली त्यांच्या नावांचा उल्लेख आहे. चितोड येथील गैबी पीरच्या दर्ग्यातून इ.स. १३२५ चा एक पर्शियन शिलालेख सापडला आहे. ज्यावरून अलाउद्दीन खिलजीने चितोडचे नाव बदलून खिजराबाद केले होते. जालोर आणि नागौर येथे सापडलेले पर्शियन शिलालेख या प्रदेशातील मुस्लिम वर्चस्वाच्या दीर्घकाळाची साक्ष देतात. पुष्करचा जहांगीर महाल शिलालेख (इ.स. १६१५) राणा अमरसिंगवर जहांगीरच्या विजयाची माहिती देतो. १६३७ मधील अजमेर येथील शाहजहानी मशिदीच्या शिलालेखातूनही या घटनेला पुष्टी मिळते.

टीप- अजमेरचे शिलालेख हे राजस्थानातील फारसी भाषेतील सर्वात जुने रेकॉर्ड आहेत।

**११. सदेश्वर शिलालेख**

या शिलालेखावरून वराह मंदिराची व्यवस्था, स्थानिक व्यवसाय कर, सरकारी अधिकारी इत्यादींची माहिती मिळते.

कुमारपाल रेकॉर्ड 1161 AD (1218 BC) अबूच्या परमारांची वंशावळ या नोंदीवरून मांडण्यात आली आहे.

**१२. चिरवेचा शिलालेख (1273 इ.स.)**

संगीतकार- रत्नप्रभुसुरी + पार्श्वचंद्र, खोदकाम करणारा- दिल्लीन चिरवे शिलालेखाच्या वेळी समर सिंह हा मेवाडचा शासक होता. उदयपूरपासून 8 किमी अंतरावर चेरवा गाव आहे. हा लेख मंदिराच्या बाहेरील भिंतीवर आढळतो. चिरवे शिलालेखात संस्कृतमधील ५१ श्लोकांचे वर्णन आढळते. गुहिल वंश, बाप्पा, पद्मसिंह, जैत्रा सिंह, तेजसिंग आणि समर सिंह यांचे वर्णन चिरवे शिलालेखात आढळते.

चिरवा शिलालेखात चिरवा गावाची स्थिती, विष्णू मंदिराची स्थापना, शिवमंदिरासाठी शेततळे इत्यादींचा समावेश आहे. या लेखात मेवारी गोचर भूमी, सती प्रथा, शैव धर्म इत्यादींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**१३. रसियाच्या छत्रीचा शिलालेख (1274 इ.स.)**

या शिलालेखाचा एक दगड टिकून आहे. जी चित्तोडच्या मागच्या गेटवर गुंतलेली आहे. यामध्ये बाप्पापासून नरवर्मापर्यंत. गुहिल घराण्यातील मेवाड राज्यकर्त्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन केले आहे. या शिलालेखातील काही भाग १३व्या शतकातील सार्वजनिक जीवनावर प्रकाश टाकतात. नागदा आणि दिलवाडा या गावांचे वर्णन आहे. दक्षिण पश्चिम राजस्थानच्या डोंगराळ भागातील वनस्पतींचे चित्रण या शिलालेखातून आदिवासींचे शिक्षण, दागिने, वैदिक यज्ञ परंपरा आणि शिक्षणाची योग्य माहिती वर्णन केलेली आहे.

**१४. चित्तोडच्या पार्श्वनाथाचा मंदिराचा शिलालेख (1278 इ.स.)**

तेजसिंगची राणी जयतल्ला देवी यांनी पार्श्वनाथ मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. जे भर्त्रीपुरी आचार्यांच्या सल्ल्याने बांधले गेले.या लेखात राज्यकारभार, धार्मिक व्यवस्था आणि धार्मिक सहिष्णुता याबद्दल माहिती दिली आहे. अबूचा लेख (1342 AD) लेख श्लोक- ६२, रचना- वेद शर्मा

बाप्पापासून समर सिंहापर्यंत मेवाडच्या शासकांचे वर्णन, या लेखात अबूच्या वनस्पतींचे वर्णन आणि ध्यान, ज्ञान, यज्ञ इत्यादींशी संबंधित लोकप्रिय मान्यता आढळतात. या शिलालेखातील लेखकाचे नाव शुभ चंद्र आहे. शिल्पी सूत्रधार यांना कर्मसिंह हे नाव पडले.

**१५. गंभीरी नदीच्या पुलाचा लेख**

हा लेख कुठल्यातरी ठिकाणाहून आणून अल्लाउद्दीन खिलजीच्या वेळी गंभीरी नदीच्या पुलाच्या 10व्या पायरीवर ठेवला होता. यामध्ये समर सिंह आणि त्यांची आई जयताल्ला देवी

यांचे वर्णन आढळते. हा लेख महाराणांच्या धार्मिक सहिष्णुतेच्या धोरणावर आणि मेवाडच्या आर्थिक स्थितीवर चांगला प्रकाश टाकतो.

**१६. शृंगी ऋषींचा शिलालेख (1428 इ.स.)**

हा लेख खंडित स्थितीत आहे. ज्याचा मोठा तुकडा हरवला होता. हा लेख कविराज वाणी विलास योगेश्वर यांनी रचला होता. हमीर बद्दल असे लिहिले आहे की त्याने जिलवाडे हिसकावून घेतले आणि पालनपूर जाळले. भिल्लांशी हमीरच्या यशस्वी युद्धाचाही उल्लेख आहे.

**१७. शृंगी ऋषींचा शिलालेख (1428 इ.स.)**

हा लेख खंडित स्थितीत आहे. ज्याचा मोठा तुकडा हरवला होता. हा लेख कविराज वाणी विलास योगेश्वर यांनी रचला होता. हमीर बद्दल असे लिहिले आहे की त्याने जिलवाडे हिसकावून घेतले आणि पालनपूर जाळले. भिल्लांशी हमीरच्या यशस्वी युद्धाचाही उल्लेख आहे. या लेखात लक्ष्मणसिंह आणि क्षेत्रसिंह यांच्या तीन टप्प्यांच्या प्रवासाचे वर्णन आढळते. जिथे त्यांनी दानधर्मात खूप पैसा दिला आणि गयामध्ये मंदिरे बांधली.

**१८. समीधेश्वर मंदिराचा शिलालेख (1485 इ.स.)**

रचना- एकनाथ यांची त्यावेळी कारागिरांच्या कुटुंबांचा साक्षात्कार. त्यातील लेख कारागीर वीझेलने लिहिला होता. वाहक चरबी

त्यात मोकल यांनी बांधलेल्या विष्णू मंदिराच्या बांधकामाचा उल्लेख आहे.महाराजा लक्ष्मण सिंह यांनी झोटिंग भट्ट सारख्या विद्वानांना आश्रय दिल्याचेही या लेखात लिहिले आहे. सिसोदिया आणि परमार घराण्याच्या माहितीचा पुरावा. चित्तोड किल्ल्यात.

**१९. दिलवारा शिलालेख (1334 AD सिरोही)**

या शिलालेखात एकूण 18 ओळी आहेत. ज्यामध्ये पहिल्या 8 ओळी संस्कृतमध्ये आहेत आणि उर्वरित 10 ओळी मेवाडी भाषेत आहेत. हा लेख धार्मिक आर्थिक आणि राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकतो. टंक नावाच्या चलनाचा उल्लेख आहे. मेवाडी भाषा वापरली गेली आहे जी त्यात बोलचालची भाषा होती.

**२०. रायसिंगची प्रशंसा (1593 मध्ये)**

जुनागड किल्ल्याच्या दरवाजावर संगीतकार- जैन मुनी जैता/जैता (क्षेत्ररत्नांचे शिष्य) हा लेख ,बीका ते रायसिंगपर्यंतच्या बिकानेरच्या राज्यकर्त्यांच्या कामगिरीचे वर्णन करतो.

60व्या ओळीत रायसिंगाच्या कार्याचा उल्लेख सुरू होतो. ज्यामध्ये काबुली, सिंधी आणि कच्छी यांच्यावरील विजय हा मुख्य आहे. या लेखात लक्ष्मणसिंह आणि क्षेत्रसिंह यांच्या तीन टप्प्यांच्या प्रवासाचे वर्णन आढळते. जिथे त्यांनी दानधर्मात खूप पैसा दिला आणि गयामध्ये मंदिरे बांधली. जव्हारच्या शिलालेखात राणा कुंभाची मुलगी रमाबाई हिचे वर्णन वागीश्वरी असे करण्यात आले आहे, कारण रमाबाई एक विद्वान स्त्री होती, हा शिलालेख उदयपूर जवळील जव्हार नावाच्या ठिकाणाहून प्राप्त झाला होता, प्राचीन नाव जोगिनी पटनम

(जवार). सिरोहीच्या बसंतगढ शिलालेखात (राजस्थानी आदित्य) नावाने राजस्थानचा प्रथम उल्लेख आढळतो.

कर्णसंवाच्या शिलालेखात मौर्य घराण्यातील राजा धवलचा उल्लेख आहे, ही माहिती या शिलालेखाशिवाय इतर कोणत्याही शिलालेखात आढळत नाही, हा शिलालेख कोटाजवळील कर्ण सामवा नावाच्या गावातून मिळाला आहे. पशुपती पंथाचे संस्थापक लकुलिष्ठे, उदयपूरच्या एकलिंगजी मंदिरातून मिळालेल्या 'नाथ प्रशस्ती'मध्ये पशुपती संप्रदायाची माहिती मिळते. बैरथ (जयपूर) येथून मिळालेल्या भाब्रूच्या शिलालेखात मौर्य शासक सम्राट अशोकाची माहिती मिळते, त्यात अशोक हा बौद्ध असल्याचे सांगितले आहे.

अचलेश्वर आणि तेज मंदिराच्या लेखात राजपूतांचे चंद्रमावंशी असे वर्णन केले आहे, बप्पा रावल यांच्यापासून समरसिंहाच्या इतिहासाची माहिती अचलेश्वर शिलालेखात आढळते. अजमेर येथील शाहजहानी मशिदीचा लेख, चित्तोड ते धैवी पीरच्या दर्ग्यापर्यंत, चिरवा यांचा लेख . चिरवा खोऱ्याजवळील चिरवा गावातून प्राप्त झाला आहे, सध्या उदयपूर येथे आहे, ग्रामीण व्यवस्थेचे वर्णन आणि सती प्रथेचे वर्णन बाप्पा रावल ते समर सिंह पर्यंत आहे.

बुंदीचे नाव वृंदावंती हे खजुरी गावाच्या नोंदींमध्ये आढळते.बुंदीच्या हाडा राज्यकर्त्यांची माहिती. संस्कृत भाषेत 227 AD मध्ये जयपूर येथून प्राप्त झालेला बर्नालाचा शिलालेख सध्या आमेरच्या संग्रहालयात संग्रहित आहे. घटियालाचे शिलालेख जोधपूरजवळील गडियाला गावात सापडतात; प्रतिहार राजा कुक्कुट राजाचे न्यायप्रिय शौर्य, राजकीय परिस्थितीचे वर्णन, इमारतीच्या बाजाराचे सुव्यवस्थित बांधकाम आणि या शिलालेखातील नाण्यांची माहिती


या लेखात गुर्जर प्रतिहारांच्या कर्तृत्वाचे वर्णन करून नागभट्ट शासकाचे एक भव्य शासक म्हणून वर्णन केले आहे.

# १०. भारतीय शिलालेखाचे ऐतिहासिक महत्त्व

प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे
इतिहास विभाग,
पी.एन.पी. महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग.

**प्रस्तावना:-**

भारतातील ऐतिहासिक शिलालेखांचा अभ्यास करत असताना असे आढळून येते की, कोणत्याही शिलालेख हे ऐतिहासिक दृष्ट्या इतिहासाचे साधन म्हणून काम करतात. प्राचीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास करत असताना प्रमुख्याने शिलालेखांना जास्त महत्त्व दिले जाते कारण ते तत्कालीन कालखंडातील महत्त्वाचे साधन म्हणून मानले जाते.



भारतीय शिलालेखांचे ऐतिहासिक महत्त्व सांगत असताना इतिहासकार, संशोधक आणि अभ्यासक यांनी तत्कालीन कालखंडातील इतिहास लिहिण्यासाठी साधन म्हणून शिलालेखांची मदत घेतलेली आढळून येते. भारतीय इतिहासाच्या प्राचीन,मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडात सुद्धा शिलालेखांना महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.

**मराठीतील पहिला लेख:-**

पुरातत्वविद्यामध्ये शिलालेखाच्या संदर्भात असे सांगितले आहे की,मराठी शिलालेख आणि ताम्रपट दहाव्या शतकापासून सापडतात श्री ' श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या मूर्तीखाली . परंत ; हे मराठी वाक्य आहे ' चाबुण्डराये करवियले० त्या लेखात कालाचा प्रत्यक्ष उल्लेख नाही .गंगराजाच्या प्रधानाच्या नावावरून अदमासे शक ९ ८३ मधील हा लेख आहे असे मानण्यात येते हाच . परंतु दिवेआगर येथील मराठी ताम्रपट शक ९ ८२ मधील आहे : असे मोरेश्वर गंगाधर . मराठी भाषेतील आद्य ताम्रपट आहे दीक्षित यांनी प्रतिपादन केले . पाटण इत्यादी , सावरगाव परळ तेर चिपळूण रांजली आहे याशिवाय आंबेजोगाई तुळपुळे यांनी आपल्या . गो . या लेखांचे संशोधन शं . ठिकाणी मराठी लेख सापडले आहेत सम्राट् अशोकाच्या काळापासून मराठी कोरीव लेख या ग्रंथात केलेले आहे ' ते यादव काळापर्यंतच्या ऐतिहासिक साधनसामुग्रीत ताम्रशासने आणि शिलालेख यांचा वाटा फार मोठा आहे मुसलमानी अमदानीत कागदाची किमया आली आणि कागदी फर्मानाबरोबर शिलालेख . आणि ताम्रपट यांचे महत्व कमी झाले.

अशोकाच्या ब्राह्मी लिपीचे लेखन:-

भारतीय शिलालेखाच्या अभ्यासक डॉ.शोभना गोखले यांच्या मते अशोकाच्या लेखातून शब्द तोडलेले नाहीत . गिरनार लेखात अक्षरापुढे अक्षर , लिहिलेले आहे . कालसी येथील लेखात दंड दिलेला दिसतो . सहस्राम येथील लेखात वाक्य संपल्यावर दंड दिलेला आढळून येतो . मास्की येथील लेखात दंड दिसतो पण तो योग्य ठिकाणी नाही . अशोकाचे लेख हे उत्कृष्टपणे कोरले आहेत . लिहिण्याचा दगड , लिहिणारा आणि कोरणारा यांनी ते परिश्रमपूर्वक तयार केले आहेत . ती लिपी एकसंघ आणि साचेबंद असल्यामुळे त्या लिपीत प्रांतिक भेद आढळून येत नाहीत . फक्त ' ध ' च्या दोन खुणा , ' ओ ' च्या दोन खुणा, ' नो ' च्या दोन खुणा आढळून येतात . त्यापैकी ' ओ ' ची दुसरी खूण फक्त धौलि , जौगढ येथील लेखातून दिसून येते.




भारतीय शिलालेखाचा वारसा-:



भारतात शिलालेख हे प्राचीन कालखंडातील मोठ्या प्रमाणात आढळून येतात, त्यामध्ये प्रामुख्याने मौर्य कालखंड, गुप्त कालखंड,आणि सातवाहन कालखंडाचा समावेश होतो. मौर्य कालखंडाचा इतिहास आणि सम्राट अशोकाचा इतिहास समजण्यासाठी शिलालेखांचा महत्वपूर्ण उपयोग होतो. शिलालेखावरून तत्कालीन कालखंडातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती समजते म्हणून शिलालेखांना इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

# ११. मराठीतील पहिला शिलालेख

प्रा. साईनाथ नरेश पाटील
कला विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग



श्रवणबेळगोळ (ता.चेन्नरायपट्टण, जि. हासन, कर्नाटक) येथे भगवान बाहुबली अथवा श्रीगोमटेश्वराची 57 फूट 6 इंच उंचीची विशालकाय मूर्ती आहे. तिच्या पायाशी शिल्पकाराने दगडी वारूळे दाखविली आहेत. त्यांतील डावीकडील वारूळाचा उजवा भाग आणि डावा पाय यांच्यामधील जागेत दोन मराठी, दोन कानडी, एक तमिळ असे एकूण पाच लेख खोदलेले आहेत. एकेकाळी जैन धर्मीयांचे अतिशय वैभवशाली व महत्वपूर्ण केंद्र असलेल्या या गावात साडेसातशेहून अधिक शिलालेख आहेत.

त्यातील पहिला मराठी शिलालेख-"श्रीचावुंडराजें करविलें" असा आहे. दुसरा लेख "श्रीगंगराजे सुत्ताले करवियलें" असा आहे.

श्रीचावुंडराय किंवा चामुंडराय हे गंग राजे राचमल्ल चतुर्थ यांचे सेनापती होते. ते थोर ग्रंथकारही होते. "त्रिषष्टीलक्षणमहापुराणम" हा त्यांचा कन्नड भाषेतील लेख. चामुंडराय पुराण म्हणूनही ओळखला जाणारा हा ग्रंथ कन्नडमधील आद्य गद्य ग्रंथ समजला जातो. त्यांनी श्रवणबेळगोळ येथील भगवान बाहुबलीची विशाल प्रतिमा उभारली. गोम्मटराय हे श्रीचामुंडराय यांचे अपरनाम. त्यामुळे त्यांनी स्थापन केलेल्या मूर्तीला लोक गोमटेश्वर म्हणू लागले.

गंगराज राचमल्ल चतुर्थ यांचा राज्यकाल शकवर्ष 896 ते 906, इ.स. 974 ते 984 असा आहे. तेव्हा या मूर्तीचे निर्माणकार्य या दशकातच झाले असावे. चामुंडरायपुराण या ग्रंथाची निर्मिती शके 900 च्या सुमाराची. त्यात चामुंडरायने केलेल्या महान कृत्यांच्या यादीत या शिल्पनिर्मितीचा उल्लेख नाही. याचा अर्थ हे शिल्प या ग्रंथनिर्मितीनंतर, म्हणजे शके 900 ते 906 या कालावधीत निर्माण झाले असावे. गंगराज राजमल्ल चतुर्थ याच्या राज्यकालाचे शेवटचे वर्ष जरी घेतले, तरी हे शिल्प शके 905 मध्ये निर्माण झाले असे ठरते.

भाविक जनतेला या लेखाची ओळख करून देण्याचा मान इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्याकडे जातो. त्यांनी 1907 साली "विश्ववृत्त' या मासिकातून या शिलालेखाविषयी सविस्तर

शास्त्रशुद्ध लेख लिहून, त्याला मराठी पहिल्या शिलालिखिताचा मान दिला. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, "महाराष्ट्र सारस्वत'कार वि. ल. भावे यांनीही हाच मराठीतील पहिला शिलालेख असल्याचे मान्य केले आहे. मात्र सर्वच संशोधक, अभ्यासकांना हे मंजूर नाही। चिं. ग. कर्वे यांनी या शिलालेखाचा काळ शके 950 च्या मागे जाऊ शकत नाही असे आग्रही, परंतु विनाधार प्रतिपादन केले आहे.

डॉ. शं. गो. तुळपुळे यांचा "प्राचीन मराठी कोरीव लेख' हा एक भव्य ग्रंथ. त्यात त्यांनी म्हटले आहे, की "शके 905चा म्हणून समजला जाणारा श्रवणबेळगोळ येथील हा लेख उत्तरकालीन म्हणजे शके 1039 चा असण्याची पुष्कळच शक्यता आहे. त्यातील दोन ओळी एकाच वेळी, म्हणजे शके 1039 मध्ये कोरलेल्या असणे हेच डॉ. हुल्ट्शच्या (यांनी या लेखाचे वाचन करून ठसे घेतले होते.) मते अधिक शक्य आहे व तसे असल्यास त्या लेखाचे प्राचीनत्व सुमारे सव्वाशे वर्षांनी कमी होते."

डॉ. तुळपुळे यांनी आद्य मराठी शिलालेखाचा मान अक्षी (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील लेखाला दिला आहे. या लेखाची शिळा अनेक वर्षे जमिनीत पडून राहिली असल्याने लेख अतिशय खराब झाला आहे. लेखात श्रीमहालक्ष्मीसाठी काही दान दिल्याची व पुण्यकृत्य केल्याची नोंद आहे. डॉ. तुळपुळे यांच्या मते या शिलालेखाची तिथी शके 934, प्रधावी या परिधावी संवत्सर, अधिक मास, बहुल पक्ष, शुक्रवार (16 मे 1012) अशी आहे. लेखात "पर्सीमसमुद्राधिपती स्त्रीकोंकणाचक्रीवर्ती' (पश्चिमसमुद्राधिपती श्रीकोंकणचक्रवर्ती) केशिदेव याचे राज्य होते असा उल्लेख आहे. हा केशिदेव म्हणजे उत्तर कोंकणच्या शिलाहार वंशातील अरिकेसरिन् अथवा केशिदेव प्रथम, असे तुळपुळे मानतात. त्याचा राज्यकाल शके 937 ते 947 (इ. स. 1015 ते 1025) असा आहे.

परंतु डॉ. मं. गो. दीक्षित यांच्या मते हा शिलालेख केशिदेव द्वितीय (शके 1117 ते 1162, इ.स. 1195 ते 1240) याचा असून, लेखातील शकांक 1132 असा आहे. डॉ. वा. वि. मिराशी यांनीही असेच मत दिले आहे. तेव्हा अक्षी येथील शिलालेखाला मराठीतील आद्य लेखाचा मान देता येणार नाही, असा अभिप्राय पडतो. मात्र पहिलेपणाच्या या स्पर्धेत आणखी एक शिलालेख असून, तो सोलापूर येथील आहे.

सोलापूरहून विजापूर रोडने कुंडल नजीक मुख्य रस्त्यापासून आत, आठ-दहा कि.मी. अंतरावर सीना आणि भीमा नदीच्या संगमावर हेमाडपंथी बांधणीचे संगमेश्वराचे मंदिर आहे. मंदिराच्या गर्भगृहात छताजवळ असलेल्या दगडी तुळईवर हा शिलालेख कोरलेला आहे. त्याकाळी असलेल्या साधूमहाराजांचे नाव त्यावर असून, पुढे "वाछितो विजयी होईबा' (जो लेख वाचेल तो यशस्वी होईल) असे म्हटले आहे. हा लेख केव्हा कोरला हे कळावे म्हणून त्यावर "शके 940' (इ.स. 1018)अशी नोंद केलेली आहे. सोलापूर येथील आनंद कुंभार या शिलालेखांच्या अभ्यासकास हा 1972 साली हा लेख सापडला. अर्थात तत्पूर्वी पुरातत्त्व खात्याने त्याची नोंद घेतली होती. "नवभारत' च्या जुलै 1975च्या अंकात या शिलालेखावरील लेख असून, त्यातही हा शिलालेख शके 940चा म्हणजे श्रवणबेळगोळच्या शिलालेखाआधीचा

असल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रा. डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांनी मात्र, या शिलालेखाचे "वाचन आणि अर्थ याचा काहीही आगापिच्छा नसल्यामुळे त्याविषयी न बोलणेच बरे,' असे मत दिले आहे.

एकंदर मराठीतील आद्य शिलालिखीत वाक्य म्हणून "श्रीचावुंडरायें करविलें' असल्याचे बहुमान्य असले, तरी सर्वांनाच ते मान्य आहे असे नाही. "वाछितो विजयी होईबा' हे वाक्यही पहिले वाक्य असू शकते.



संदर्भ

1. "मराठीतील पहिला शिलालेख कोणता?' - प्रा. डॉ. ब्रह्मानंद देशपांडे, विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक 1996, पृ. 91 ते 104.

2. "मराठीतील पहिले वाक्य' - श्याम भुर्के, रुची (महाराष्ट्र दिन विशेष), मे1997, पृ. 12.

# १२. प्राचीन बौद्ध लेणी कुडे

प्रा.शिल्पा स्वप्नील दाभणे
भूगोल विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग

## प्राचीन बौद्ध लेणी कुडे

मुंबई गोवा महामार्गावर मुंबईपासून किलोमीटर अंतर तर माणगाव इंदापूर पासून 130 किलोमीटर अंतरावर 21 कुडे हे ठिकाण आहे. कुडे (तळा) हा रायगड जिल्हा या ठिकाणी वसलेला गाव आहे. समुद्रकिनाऱ्यापासून जवळच असणारे हे गाव आहे . या ठिकाणी 26 लेण्या डोंगरालगत कोरल्या असून मुरुड जंजिरा पासून जवळ आहेत. इसवी सन साली 1948 या लेणीची नोंद घेण्यात आली. लेणीपर्यंत जाण्याकरता राजपुरी येथील खाडी ओलांडून जावे लागते म्हणून खूप वर्षही लेणी प्रसिद्ध नव्हती.

## पूर्व परिचय

लेणीजवळ मांदाड बंदर आहेमांडळ , म्हणजे रोमन लेखकांनी सांगितलेले मेंडागोरा बंदर मांदाड येथील उत्खननात सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी विटा व खापरे सापडली आहे. ते सातवाहन साम्राज्याचे महाभोजनांच्या मांदव घराण्याचे केंद्र होते.

## इतिहास

ही लेणी दोन टप्प्यात कोरलेली आहे. क्रमांक खालील स्त 19 ते 1रावर 26 ते 16 लेणी वरील स्तरावर आहे. यात **बौद्ध मूर्ती** इसवी शतकामध्ये स्थापन केलेल्या आहेत लेणी मधील गुहांपैकी चार चैत्यगृह आढळतात 26.

कुडे लेणी ही बौद्ध लेणी म्हणून ओळखण्यात येतेवर्षाच्या कालखंडात 100 इसवी सन पूर्व . दंडा राजपुरी येथे सातवाहनांची सात सामंत महाभोज यांची राजधानी होती. त्यांनी बौद्ध भिक्षुकांना वास्तव्यासाठी खोदलेली ही लेणी समुद्रसपाटीपासून फूट उंच 200 उंच असून एक डोंगर रांगेत आहे. इसवी सन .साली डोंगराच्या कपारीतील या लेण्यांचा शोध लागला 1848 इसवी सन तिसऱ्या शतकात निर्माण केलेल्या बौद्ध लेण्यांमध्ये कुड्याचा लेणीचा समावेश केला जातो. या लेणीची पहिली नोंद सालची सापडते 1848.

पवित्र बौद्ध त्रिकुटाचे वर्णन करणारी बौद्ध शिल्पे आणि बुद्धाच्या जीवनातील काही भाग सहाव्या शतकातील आहेत 2 .व व्या शतकातील लेण्यामधे सुरुवातीची शिल्पपट 3 प्रादेशिक कलेची झळक आहे. कुडा लेणी मध्ये चार चैत्य प्रार्थना हॉल आणि शिलालेख आहेत उर्वरित लेणी बौद्ध भिक्षुकांना राहण्यासाठी निवासाची संरचना आहे. विहारासाठी एक प्रशस्त हॉल आहे त्याचबरोबर अप्रतिम असे लेणीच्या भिंतीवर गौतम बुद्धांचे कोरलेले प्रतिमा आढळून येतात. मुख्य द्वारावर दोन्ही बाजूला कोरलेले हतीचे मूर्ती आहेत. भिंतीवर विविध प्रकारचे गौतम बुद्धांचे प्रतिमा कोरलेल्या आहेत तसेच मनाला सुख देणारे अतिशय सुंदर असे दगडामध्ये कोरीव कामाचे नक्षीदार काम केलेले आहे. ध्यानस्थ बसण्यासाठी भिक्षुकांना एक

प्रचंड मोठा कक्ष असून तो विविध प्रकारच्या नक्षीकाम आणि सुशोभित अशा भिंतींचा चित्रीकरण केलेले आहे. एका शिलालेखात टिप्पोकॉपस (समुद्री घोडा) एक पवित्र प्रतीक म्हणून चित्रण शोभत आहे. या ठिकाणी असंख्य पाण्याच्या टाक्या आहेत त्याच वापर लेणीतील रहिवाशांसाठी किंवा पाणी साठवण्यासाठी केला गेला असावा. कुडे हे नैसर्गिक रम्य ठिकाण एक समृद्ध बंदराच्या परिसरात आणि दख्खनच्या पठारावरील व्यापारी केंद्राशी जोडणाऱ्या व्यापारी मार्गावर आहे.

**या लेण्यांमुळे कळतं की कोकणाचे थेट इटलीपर्यंत संपर्क आहे.**

या लेण्यांमध्ये मिळणारी माहिती इतिहासशी असलेले संबंध याची उकल होते . महाराष्ट्रात असलेल्या प्राचीन बौद्ध लेण्या जगभरात असलेले अमाप सौंदर्य प्रकट तर करतातच .पण परदेशी संबंध सुद्धा दर्शवतात

**रोम सोबत व्यापार आणि सांस्कृतिक संबंध असलेली लेणी म्हणजे कुडा लेणी.**

इसवी सन तिसऱ्या शतकात निर्माण करण्यात आलेल्या बौद्ध लेण्यांमध्ये कुडालेणीचा समावेश केला जातो आहे .मुरुड जंजिरा पासून त्याकाळी परकीय व्यापारी व आक्रमकांचे हातभार लागला हे मांदाड बंदरावरून स्पष्ट होते.

रोमन लेखकांनी कुडा लेणीत व्यापारांनी घेतलेल्या आश्रयाची वर्णन लिहून ठेवलेले आहेत **इंडियन स्टडी सेंटर मुंबई** येथे अनेक संदर्भावरून कोकण रोम यांचा पहिल्या दुसऱ्या शतकात अजून काय संबंध आहे याची माहिती घेण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहेयातून रोम . सोबत असलेल्या व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध स्पष्ट होतात.**इंडो रोम पोर्ट ऑफ मेंडागोरा** येथे उल्लेख केला आहे. कुडे लेणी आणि मांदाड आज भलेही दुर्लक्षित असले तरी त्याचा इतिहास हा अती प्राचीन आणि महत्त्वाचा आहे.

# १३. पांडव (पांडू) लेणी ( नाशिक )

प्रा. योगिता नंदकुमार पाटील
हिंदी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग

पांडवलेणी लेणी, ज्यांना पांडू लेणी किंवा नाशिक लेणी म्हणूनही ओळखले जाते. वास्तविक पांडवलेणीचा आणि पांडवांचा काहिही संबंध नाही. पांडवलेणी ही सातवाहन आणि क्षत्रप कालखंडात खोदली गेली. या ऐतिहासिक लेणी आहेत. महाराष्ट्रातील नाशिकच्या मध्यभागी दक्षिणेस सुमारे ८ किलोमीटर अंतरावर त्रिरश्मी डोंगराच्या पठारावर असलेल्या पांडवलेणी या दोन हजार वर्षांहून अधिक जुन्या आहेत. पांडवलेणी लेणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या २४ लेण्यांचा हा संग्रह असून यामध्ये २९ शिलालेख आहेत. पांडवलेणीतील शिलालेखांमधून महत्त्वाची आणि ऐतिहासिक माहिती समजते. यातून त्यावेळीच्या प्रातांची नावे, पर्वत, नद्या, शहरे, गावे व खेडी अशा इतिहासातील बऱ्याचशा भागांचा खुलासा होतो. शिलालेखात कण्ह अथवा कृष्ण, हकुसिरि अथवा हकुश्री, क्षहरात आणि नहपान, उषवदात, गौतमीपुत्र सातकर्णी, वासिष्टिपुत्र पुलुमायी, यज्ञश्री सातकर्णी, माधरीपुत्र शिवदत्त आणि ईश्वर या राजांची नावे व वर्णन आढळतात. या रहस्यमय गुहांमध्ये संगीत कारंजे, संग्रहालये आहेत. आतमध्ये असंख्य मठ, देवळे, पाण्याची टाकी, खांब आणि कोरीव काम आहे.

पांडव लेणी पूर्वी 'त्रैराष्मी लेणी' म्हणून संबोधली जात असत. महत्वाचे म्हणजे या लेण्यांना पांडवलेणी असे नाव आहे कारण या ठिकाणी काही काळ पांडव वास्तव्यास होते म्हणून त्यांना पांडवलेणी असे म्हणतात अशी दंतकथा ऐकिवात आहे. या लेण्यांना पुंडू असे संबोधले जाते. ज्याचा पाली भाषेत अर्थ आहे "पिवळया रंगाचा रंग". कारण लेण्यांजवळ "चिवरा किंवा पिवळे वस्त्र" परिधान करणाऱ्या बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान होते. पुढे, पुंडू हा शब्द बदलून पांडू गुहा झाला अनेक दशकांनंतर लोकांनी त्याला 'पांडव गुहा' असे संबोधण्यास सुरवात केली.

पांडवलेणीच्या प्रवेशद्वारातून आत शिरताच प्रथम दर्शन होते ते १० व्या क्रमांकाच्या लेणीचे. हे लेणे नहपानाचे लेणे अथवा नहपानाचा विहार म्हणूनही प्रसिद्ध आहे. नहपान हा इराणी शब्द असून नह म्हणजे 'जनता' व पन म्हणजे 'रक्षणकर्ता'. स्तंभ, ओसरी, कोरीव शिल्प विहार, आतल्या खोल्या अशी याची रचना आहे .ओसरीतील भिंती सर्व वर विदेशी क्षत्रपांचे शिलालेख आहेत.

सातवाहन आणि क्षाहरत या दोन महत्त्वाच्या राजवंशांनी हीनयान बौद्ध भिक्खूंसाठी पांडवलेणी गुंफा बांधल्या. एकूण चोवीस लेणींपैकी तीसरी आणि दहावी लेणी सर्वात आश्चर्यकारक आहेत. या लेण्यांमध्ये एक वैशिष्ट्यपूर्ण आणि भव्य वास्तुकला आहे. नाशिकच्या या भूभागावर

सातवाहन राजांचे अधिराज्य असल्याचे पुरावे येथे पाहायला मिळत असून नाशिकचा उल्लेख या शिलालेखांतून वाचायला मिळतो.

प्रत्येक लेणीचा निर्मिती काळ वेगवेगळा आहे. लेण्यांमध्ये कोरले गेलेले गौतमीपुत्र सातकर्णीची महती सांगणारे शिलालेख आहेत ज्यांचा महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाच्या शिलालेखांमध्ये समावेश होतो. सातवाहन राजे ब्राह्मण असून वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते. लेणी क्रमांक १४ मधील शिलालेखात दोन हजार वर्षांपूर्वी नाशिकचे नाव 'नासिक्य' असल्याचे दिसते. १८वी गुंफा चैत्य आहे, जे मूलत: एक मंदिर किंवा प्रार्थनागृह आहे ज्याच्या एका टोकाला स्तूप आहे, संपूर्ण गटातील सर्वात जुनी लेणी म्हणजे गुहा क्र. १८ आहे जी विशेषत: अलंकृत आहे ज्यामध्ये स्तूप आणि सुंदर, विस्तृत कोरीवकाम केलेले आहे. लेणे क्र. २१ व २२ साधारण आहेत. लेणे क्र. २३ हे एक विशाल लेणे असून सहा ते सात लहान खोल्यांपासून बनले आहे. या लहान खोल्या काही प्रमाणात तोडून एक भव्य आवार तयार केले आहे. या लेण्यात गौतम बुद्ध, अमिताभ बुद्ध, बोधिसत्त्व, नागराज इ. शिल्पे, खंडित स्तूप व दोन ब्राह्मी शिलालेख आहेत. लेणे क्र. २४ हे दोन खोल्या असलेले एक लहान लेणे आहे. या लेण्यात वाघ, बैल, दोन कुबडे असलेला उंट, मेंढी, डुकरे, हरीण, स्त्रीचे मुख असलेला घोडा, घुबड, उंदीर आणि लहान मुले इ. शिल्पे व दोन शिलालेख आहेत. पांडवलेणी या बहुतेक विहार आहेत, म्हणजे पावसाळयात प्रवासी भिक्षूंनी वापरलेली निवासस्थाने किंवा आश्रयस्थान आहेत.

काही लेण्यांत स्त्रियांचे अलंकार आणि वस्त्रे अतिशय कलाकुसरीनी कोरलेली आहेत तर काही लेण्या मोठ्या असून त्यामध्ये असंख्य कक्ष आहेत. या गुहेत बुद्ध, बोधिसत्व, राजा, शेतकरी, व्यापारी आणि श्रीमंत प्रतिमा असलेले इंडो – ग्रीक वास्तुकलाचे एकत्रीकरण दर्शविणारी श्रीमंत मूर्त्यांची प्रतिमा असून या जागेवर एक उत्कृष्ट पुरातन जल व्यवस्थापन प्रणाली असून कुशल घन खडकातून छिद्रयुक्त अनेक आकर्षक पाण्याच्या टाक्या सुद्धा आहेत. बुध्दस्तुप, भिक्षूंची निवासस्थाने, बुध्द, जैन तीर्थंकर ऋषभदेवजी, वीर मणिभद्रजी, माता अंबिकादेवी यांच्या मूर्त्या, पाच पांडव मूर्त्या, भीमाची गदा, कौरव मूर्त्या, इंद्रसभा, देवादिकांच्या मूर्त्या या सर्व लेण्यात आहेत.परंतु काही लेण्या व त्यातील मूर्त्या चांगल्या स्वरुपात तर काही खंडीत स्वरुपात शिल्लक आहेत.

अशाप्रकारे एकूण २४ लेण्यांची असलेली ही माळ २९ शिलालेखांनी, शिल्पांनी, देखण्या तक्षीकामाने सालंकृत झालेली आहे.

# मराठी वाङ्.मय मंडळाचे विशेषांक



२७ फेब्रुवारी, २०१९

## पु.ल.देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक

२०१९ हे वर्ष पु.ल.देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने पु.ल.यांच्या व्यक्तिमत्त्वार आणि त्यांच्या एकंदरीतच साहित्य संपदेवर भर देणारा हा विशेषांक मराठी विभागाने तयार केला होता.



२७ फेब्रुवारी, २०२०

## मराठीतील बोली विशेषांक

मराठी भाषा ही अनेक बोलींनी समृद्ध बनली आहे. या मराठीतील आगरी, कोळी, कातकरी, मालवणी, अहिराणी, कोरकू,चंदगडी, तावडी,देहवाली, झाडी, डांगी आदी निवडक बोलींवर प्रकाश टाकणारा विशेषांक मराठी विभागाने तयार केला होता.



२७ फेब्रुवारी, २०२१

## नक्षत्रांचे देणे - मराठी कवी विशेषांक

नक्षत्रांचे देणे ही मराठीतील ज्येष्ठ कवी आणि गीतकारांना वाहीलेली लेखांजली आहे. निवडक कवींच्या समग्र साहित्य विश्वाचा धांडोळा लेखमालेतून व्यक्त करण्याचा प्रयत्न मराठी विभागाने हा विशेषांकाद्वारे केला होता.

## माझ्या म-हाठाचि बोलु कवतुके । परिं अमृतातेही पैजा जिंके ।
## ऐसी अक्षरे रसिके । मेळविन ॥

भागवत धर्माचा पाया रचणा-या संत ज्ञानेश्वर माऊलींचे हे मराठीबद्दल गौरवोद्गार कधीही आणि कुठेही वाचले की, मन आत्मानंदाने गहिवरुन येते. अचेतन मनाला सचेतन उर्जा या काव्यपंक्तीतून लाभते. २७ फेब्रुवारी हा कविकुलगुरु कुसुमाग्रज अर्थातच मराठी साहित्याची पताका अखंडपणे खांद्यावर मिरवणारे ज्येष्ठ साहित्यकार विष्णू वामन शिरवाडकर यांची जयंती. यानिमित्ताने आपण जागतिक मराठी भाषा दिवस ठिकठिकाणी उत्साहात साजरा करतो. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषा दिन साजरा व्हावा म्हणून गेले अनेक दिवस शासन सर्व स्तरांतून प्रबोधन व उद्‍बोधन करीत आहे. या दिवशी मराठी भाषा विषयक अनेक लावण्यवान शब्दरुपी लेख लिहिले जाऊन मराठी संस्कृती जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न होईल. पण मराठी संस्कृती जपणे म्हणजे नेमके काय? लेख किंवा एकदिवसीय उपक्रम करुन प्रश्न सुटणार नाहीत. तर आजच्या दिनापासून मराठी अस्मिता चळवळ जागृत ठेवण्याचा सर्वस्तरीय प्रयत्न करावयास हवा. या कारणेच आमचे पुस्तकरुपी लेखन हे रायगड जिल्ह्यातील दुर्लक्षित शिलालेख आणि लेण्यांवर आधारीत आहे. अनेक शिलालेखांच्या लिपींचे प्राचीन मराठी साहित्याला बहुमोल योगदान आहे. म्हणूनच २७ फेब्रुवारीचा मराठी भाषा दिन हा आम्ही मराठी साहित्याचे वैभव असणा-या शिलालेख आणि लेणी यांच्यावरील लेखाने साजरा करीत आहोत.

डॉ.ओमकार पोटे
प्र.प्राचार्य

